# प्रकरण ३ रे

## झोंबी, नांगरणी, घरभिंती यांची संक्षिप्त रूपरेषा

### झोंबी

**शिक्षणासाठी प्रतिकूल परिस्थितीशी झगडणारा झोंबी घेणारा नायक :**

'झोंबी' या आत्मचरित्रात्मक कादंबरीत एकूण तीन भाग आले आहेत. पहिल्या भागात लेखकाच्या जन्मापूर्वीचा भाग आला आहे. लेखकाला शाळेत जातानाचा दिवस आठवतो ते म्हणतात, शाळेत जाण्याचा पहिला दिवस चांगला आठवतो. त्याची तयारी घरात गुढीपाडव्याच्या अगोदर पंधरा दिवस चालू होती. कल्लूअळाकडं माझी कुडत-चड्डी शिवायला टाकली होती. नवी रंगीत पट्ट्यांची पिशवी विकत आणली होती. दादाच्या हाताला धरून बाजारात जाऊन कटक्याच्या दुकानातन कोरी करकरीत पाटी आणि पेन्सिल आणली होती. [१] अशी शाळेत जाण्याची तयारी केली होती. "पाडव्याच्या दिवशी सकाळी लौकरच आईन उठवून आंघोळ घातली. डोक्याला पचपचीत तेल लावून त्याच तेलाने हात माझ्या तोंडावरन, हातापायावरन फिरविले. नवी कापडं घातली. डोक्याला काळी टोपी घातली. तोपर्यंत दादाचं गुढी उभी करण संपल होत. मी अधीरतेन ते संपण्याची वाट बघत होतो." [२] अतिशय आनंदी वातावरणात लेखक शाळेत जाण्यास निघाला, तेव्हा त्याचे वडील म्हणाले "लई शिकायच बरे काय?" लेखक म्हणाले "हां ऽ! " मी खुश झालेला यावर वडील म्हणाले" दिवाणजी व्हायला पाहिजेस बघ. [३] लेखकाला शाळेत घालून त्याचे वडील आनंदी होते. नंतर मात्र रूढी, परंपरा, परिस्थितीमुळे वडिलांनी त्यांच्या शिक्षणाला विराध करून शेतीच्या कामाला जुंपले. अशा अनेक तरूणांचे शिक्षण व्यवस्थितरित्या सुरू झाले पण काही कारणामुळे ते बंद पडत गेले. 'उपरा' मध्ये लक्ष्मण माने यांचे शिक्षण त्यांच्या कुटुंबाच हया गावातून त्या गावात फिरण्यामुळे विस्कळीत झाले.

लेखक शाळेत गेल्यावर "साकेकर मास्तर हातात हिरवी छडी घेऊन, नकाशावरची रंगीत चित्र दाखवत." अननसातला अ ऽ आगगाडीतला आ ऽ इटीदांडूतला इ ऽ ईडलिंबातला ई ऽ असं मोठयानं ओरडत." [४] हे सर्व नांवन असल्यामुळे लेखकाला अपरिचीत वाटत होते. तरीही हे शिकायच म्हणजेच शाळा शिकायची, एवढी समजूत पक्की झाली. शाळेत असतानाच्या अनेक गंमती जमती लेखकाने सांगितल्या आहेत. जिन्या जवळची खिडकी, निंबाळकर मास्तरांचा खाल्लेला मार, भूतांविषयी असलेले अनेक गैरसमज मास्तरही भूतांविषयी गोष्टी फुलवून सांगत. "त्या वर्षी भूताच्या गोष्टी इन्फंट्रीच्या वर्गात फार पिकल्या. पोर शाळेला यायला भिऊ लागली. निंबाळकर मास्तरांनीच एके

दिवशी 'शां s s त् बसा s s' म्हणून आम्हाला बरच काही देव आणि भूत यांच्याविषयी सांगितले. यावर एवढच आठवतय की "देवाला भूतं भितात आणि 'राम'चं नावे घेतल्यावर तर भूतं पा s र पळून जातात आणि हे तर 'रामा' चे मंदिरच आहे. इथं भूतांना थारा नाही. भूत रामापासनं शंभर हात लांब असतात म्हणून भूताबद्दल भिण्याचं मुळीच काही कारण नाही." [५] मास्तराच्या हया बोलण्यामुळे त्यांना खूप धीर आला होता. ग्रामीण भागात भूता खेतांच्या गोष्टीला खूप उत येत असे. समाजामध्ये भूता खेतांविषयी अनेक गैरसमज असत याचा परिणाम लहान मुलांच्यावर मोठया प्रमाणात होत असे.

घराच्या मागच्या परडीचा उपयोग लेखकाने बिडया ओढण्यासाठी केला. मामाला बिडया ओढण्याचा खुप नाद. लेखकाचा मित्र शिर्प्याही बिडया ओढत असे. लेखक म्हणतात "मामा मला नेहमी बिडया आणायला सांगे. आमच्या गावातच बिडया तयार होत. तिथच त्यांना शेक दिला जाई. त्यांना शेक दिल्यावर त्यांचा त्यांना छान वास येई. बिडया आणताना त्यांचा वास घेत घेतच मी बिडया आणी. मामाही अशा रीतीन बिडया ओढी, की ते बघून मलाही बका बका धूर गिळून नाकातून काढावासा वाटे. एकदा बिडया आणताना धाडस करून, बंडलातली एक बिडी काढून खिशात ठेवली. बिडयांचा बंडल मामाला देवून टाकला. घरात कुणी नाहीसं बघून चुलीपुढं जाऊन ती पेटवली. दोन झुरके मारले नि चरचरून पेटवली नि पळत परडयात जाऊन ओढली." [६] हळूहळू बिडया ओढण्यात लेखक पटाईत झाला. पुढे तर त्याने चार मित्रांनाही बिडया ओढण्याचा नाद लावला. काही दिवसानंतर "दादा नुकताच जेवून सोप्यात चिलीम ओढत बसला होता. मी गल्लीत खेळून दमल्यावर उनाचं घराकडे परत आले सरळ आत चाललो. उंबरा ओलांडून आत येताना दादानं माझ्याकडं बघितलं त्याल कसला तरी संशय आला.

"हिकडं ये रे जरा"

"काय"? मी सरळ गेलो.

"चड्डीला काय लागलय ते?"

"कुठाय?" महणत मी जवळ गेलो.

त्यान सरळ माझं बखोट धरल नि माझ्या चड्डीच्या खिशात हात घातला. खिसा चांगला फुगलेला होता. त्यातनं पंचवीसभर बिडयांची थोटकं आणि एक काडयाची पेटी बाहेर पडली.

"काय हे?" [७]

लेखक म्हणाला " तंबाखुची राखुंडी करायला आणल्यात तुझ्यासाठी" [८] दादाला तंबाखुची मिसरी लागत होती. त्याचा फायदा घेऊन मी काही तरी उत्तर दिल.

वडिलांचा राग अनावर होवून ते म्हणाले,"खोट बोलतस, तुझ्या आयचं कार्ट तुझ्या" म्हणून त्यांन चोरून भाकरी पळवणार कुत्र एकदा तडाख्यात सापडल्यावर जसं बडवतात तस मला बडवल तेव्हापासनं बिडीच नाव नाही." [१] अशी व्यसने लागून त्याच वयात सुटली. मोठया माणसाचं अनुकरण करून त्यांच्याप्रमाणे वागण्याची सवय या ग्रामीण भागातील मुलांना लागते. वडिलांनी कोणतेही आदर्श शिकविले तरी वडिलच जर ते आदर्श पाळत नाहीत तर मुलांच्यावर संस्कार करून त्याचा उपयोग नाही. मास्तरांनी वर्गात 'नेहमी सत्य बोलावे' असे सांगावे घरी मात्र कोण पाहुणे आले तर स्वतःच्या मुलाला मास्तर "घरात नाहीत म्हणून सांग" असे सांगावे हा निव्वळ ढोंगीपणा आहे. उपरा मधील लक्ष्मण माने, 'अक्करमाशी' मधील शरणकुमार लिंबाळे, 'बलुतं' मधील दया पवार, 'तराळ-अंतराळ' मधील शंकरराव खेरात. 'उचल्या' मधील लक्ष्मण गायकवाड या तरूणंनाही त्याच्या लहान वयातच व्यसने लागली आहेत. यापाठीमागे त्यांची घरची असणारी परिस्थितीच प्रामुख्याने जबाबदार आहे. 'उचल्या' मधील लक्ष्मणच्या वडिलांचा खिसेकापू हा धंदा आहे. यामुळे त्यालाही हा वडिलोपार्जित धंदा स्विकारावा लागतो.

शाळेमध्ये असताना अनेक खोडया ते करत कोणाच्या वहया पळवत तर रस्त्यावर पडलेल्या आंब्याच्या कोया, खजूर-खरकीच्या बिया कळत-नकळत तोंडात घालत असत. त्यांचे खेळ अनेक प्रकारचे होते. काडयाच्या पेटयावरील चित्रे, आचुके, कन्हेर, पेन्सिलचे तुकडे, कोपरी बटने यांनी ते खेळले. या खेळात कधी कोणाची हार तर कधी कोणाचा विजय होत असे.

शाळेच्या मधल्या वेळेत वर्गातच बसून राहिल्यामुळे चंद्रकांत मेरवाडे, बापू कोळी, सुरेश माने या वाचनवेडया मुलांशी मैत्री झाली. पहिल्यांदा त्याला पोर जवळ करत नसत. पण लेखक त्यांना चिकटून वागे. त्यांची बारीक सारीक कामं करी. चंद्रकांत खेळात हरत त्याला लेखक कालांनी खेळून काला जिंकून देत. त्यातून मैत्री वाढली. त्यांची नवीन पुस्तके आणण्यासाठी घरातील दहा रूपये चोरले. 'शहा अॅन्ड सन्स' या दुकानातून 'गोष्टीचा तास-भाग दुसरा', 'उंदीरमामाच्या गोष्टी' आणि 'चतुर बिरबिल'-भाग चौथा, ही पुस्तके खरेदी केली. पुस्तकासाठी खोट बोलणं दिवसंनदिवस वाढत गेल "बारीक - मोठी पंचवीस तीस पुस्तकं माझ्याकड जमली. चौथीच्या वर्षात मी, मेरवाडे, माने अशा तिघांनी मिळून, एखादी फिल्म किंवा पेन्सिल किंवा कोपरी बटण घेऊन, मुलांना एकेक दिवस पुस्तक वाचायला देण्याची प्रथा पाडली. सगळा चौथीचा वर्ग गोष्टीची पुस्तके तेव्हा वाचू लागला. मुळं गोष्टीची पुस्तक खरेदी करू लागली. अभ्यास सोडून वाचू लागली त्यामुळ मास्तराचा मार खाऊ लागली. शहाच्या आणि वसंत पेंटरच्या दुकानात नवी नवी गोष्टीची पुस्तक भराभर येऊ लागली. बरीच मुल एकमेकांत गोष्टीची पुस्तक अदल।बदल करून वाचू लागली. मी ही त्यात सामील झालो. त्यामुळं नवी पुस्तकं

विकत घेण्याचा झपाटा कमी झाला. दहा रूपयाच भांडवल संपल होत. वाचनाच वेड मात्र वाढतच गेल." [१०] वाचनाच्या वेडामुळे चोरीचेही प्रमाण वाढत गेल. लेखक म्हणतो "मला आठवतय की, पुढ पाच-सहा वेळा मी तरी दादाच्या कोटाच्या खिशातले चार-आठ आणे मी हात घालून पळवले असतील". [११] चोरी उघडकीला आल्यावर त्याचे प्रमाण कमी आले.

'उपरा' मध्ये लक्ष्मणची आई दुस-याच्या शेतातून चोरी केली म्हणून गावातील सुवर्ण लोक नवरा-बायको दोघांनाही जबर मार देतात. तर 'उचल्या' मध्ये लक्ष्मण पाकीट मारताना सापडतो, पोलिसांचा मार खातो. आनंद यादवांचे चोरी करण्याच कारण नविन पुस्तके घेणे होते तर आपली पोटाची भूक भागविण्यासाठी चोरी करण्याची वेळ दलितांच्यावर येताना दिसते.

चौथी पास होईपर्यंत वडिलांनी आनंदाने आपल्या मुलाला शिकविले. लिहायला, वाचायला आल एवढ पुष्कळ झाल होत. आता मुलाने वाडवडिलार्जीत शेती करावी अशी त्यांची रास्त अपेक्षा होती. लेखकाला शिक्षणाला विरोध होऊ लागला. तर 'उपरा' मध्ये लक्ष्मण मानेला वडिलांनी तो शाळेत जात नाही म्हणून काठीने मारलेले दिसून येते.

पाचवीच्या वार्षिक परिक्षेच्या दिवशी गस्ते मास्तरांनी सहा महिन्याची फी भरली तर दुपारी पेपरला बसून देईन असा दम लेखकाला दिला. वडिलांना फी बद्दल सांगितल्यावर ते भडकले". मूत त्या शाळंवर तुला मी परवादिशी काय सांगितल हुंत, आपणाला शाळा नगं म्हणून आता बारा आणे म्हंजे दोन बायकांचा पगार ते देऊनबी नापास झालास तर, तेवढा पैसा त्या मास्तराच्या मढयावर घाटल्यागत हुईल. [१२] लेखकाला गप्प बसण्याशिवाय पर्याय नव्हता. कारण वडील भडकले म्हणजे हाताला लागेल ते फेकून मारत होते. यावरून समाजात असणारी शिक्षणाबद्दलची अनास्ता. लेखकाच्या वडिलांचा आडाणीपणा दिसून येतो. लेखकाला बारा आण्यासाठी शाळा कायमचीच सुटणार याची भिती वाटत होती. लेखकाची शाळा अर्ध्यातनंच सुटली नि वडिलांची खात्री झाली की, आता मुलाची शाळा कायमची बंद झाली. येथे यादवांच्या शिक्षणाला विरोध होत होता तर 'उपरा' मधील लक्ष्मणचे वडील मुलाला शिक्षण घेण्यास प्रोत्साहन देत होते. 'तराळ-अंतराळ' मधील शंकरराव खरात यांच्या आई-वडिलांनी प्रोत्साहन दिलेले दिसते.

याच काळात शिक्षण बंद झाल्यामुळे यादवांना शेणकुंट विकून सिनेमा बघण्याचा नाद लागला. पण वडिलांच्या मारामुळे त्याचे प्रमाण कमी झाले. 'उपरा' मध्ये लक्ष्मण माने यांनाही शाळा बुडवून नदीला, ओढयाला खेकड, मासे पकडण्याचा नाद लागला होता. सिनेमा बघण्यासाठी अनेकवेळा यादव उपाशी राहिले, आईच्या शिव्या खाल्या ती म्हणत 'काय म्हणून एवढ मालक मारतोय, मला तुझ्या अशा वागण्याचा कावकिक्क

येतोय, रोज दिसभर राबतोस नि रातच उपाशीच पळतोस. एवढे काय मिळतय तुला त्या सेनेमात ?' [१२] काय मिळतय हे मला माहित नव्हते पण सिनेमा सारा बघु वाटत होता.

लहान मुलांना कामाला लावून दादा खुशाल गावातून फिरत होता याचा परिणाम म्हणूनच लेखकाच्या बहिणीने आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला ती म्हणते "मला कट्टाळा आलाय कामाचा मला नको आता हयो जीव ती आपला हात माझ्या हातातनं सोडून घेऊ लागली". [१४] नि पाण्याकडं झेपावू लागली. घरातील मुलांचा वापर शेतातील कामाला करून घरातील कर्ता म्हणून गावात मिरविण्याची सवय अशा पुरूषांना लागते. यामुळे लहान मुलांच्या मनावर या कष्टाचा अतोनात ताण येऊन ही मुले आत्महत्येकडे प्रवृत्त होतात.

आठ मुल झाली तरी दादा आईला मारत होता. स्वत:ला खायला भरपूर पाहिजे, कपडे चांगले पाहिजेत. काहीही काम न करता गावात फिरणे. मुलांनी मात्र काम केले नाही तर त्यांना बेदम मार देणे. ही मनोवृत्ती उच्चवर्णियांच्या राहणीमानातूनच आलेली दिसून येते. लेखकाची आई कष्ट करून पै-पै गोळा करून मुलांना कपडे, चांगले खाऊ घाल, दूध पाज अशी काळजी घेत असे. वडिलांच्या अडाणीपणामुळे, आळसीपणामुळे कधी पोराबाळांना बाजारातनं काही आणल नाही. दुस-यान आणल तर ते पोरांना नीट खाऊन देत नसे. स्वत: मात्र पोटभर खात असे. घरातील मुलांचा विचार न करता आपल्या बेजबाबदारपणामुळे दिवसभर मुलांना शेतात कामाला लावून स्वत: मात्र ऐषआरामात राहून मुलांच्या कष्टावर जीवन मजेत घलविणे, घराचा विचार तर हे लोक करतच नव्हते.

मळयाच्या शेजारीच संघाची शाखा होती तेथे पंचवीस-तीसभर तरूण मंडळी लेखकाच्या वयाची जमत तेथे असणा-या हळदीकर नावाच्या प्रमुखांनी लेखकाला शाळेत घालण्यास त्याच्या वडिलांना सांगितले. अशा अनेक संघाची स्थापना त्यावेळी ग्रामीण भागातील मुलांना शिकविण्यासाठी होत मुलांना खेळातून शिक्षण देण्याचे कार्य ही मंडळी करत होती. हळदीकर यांनी लेखकाच्या वडिलांना खूप समजावून सांगितले पण वडिलांनी त्यानाही दाद दिली नाही. वडिलांच्या अशिक्षितपणा, आडाणीपणामुळे लेखकाच्या शिक्षणात खंड पडला. लेखकाची शिक्षणाची इच्छा वाढतच होती. वडिलांचे मित्र विठोबा म्हणतात. "आरं खुळया, सगळया गावठीची पोर शिकाया लागल्यात. सणगरं नि धनगरंबी आपली पोरं शाळंला लावून द्यायला लागल्यात. हाय शाहु महाराजांची म्हणुन त्येंन गावात एकाला दोन शाळा बांधून दिल्यात. घेकी त्यंचा फायदा". [१५] यावर लेखकाचे वडील म्हणाले "काय करायची आम्ही शेतक-याला शाळा? शेवटाला हातात नांगराचा मिट्टाच यायचा न्हंव? भटा-बामणंनी शाळा शिकावी." [१६] याच्यावर दादाची समजूत काढत विठोबा अण्णा म्हणाले "भटा बामणास्नीच काय शिक्षणाचा मक्ता दिलेला न्हाई. उलट महाराज

सांगायच रयत हो, शिका नि शाणं व्हा. कोर्ट कचे-यात, शाळा हापिसात नोक-या करा पोरं-बाळं शिकवा नि जन्माचं कल्याण करून घ्या-आणि तुझ काय ज्ञान हे! - आता पोरगं पाचवीपोतर आलंय. हिकड-तिकड अजून दोन वर्सं शिकलं तर सातवी हुईल. कुठबी शाळेत मास्तर म्हणून लागलं." [१७] आडाणी, अज्ञानी, असलेल्या रूढी, पंरपराच जाळयात अडकलेल्या यादवांच्या वडिलांना आपलंच म्हणणे खरे करण्यची प्रवृत्ती येथे दिसून येते.

लेखकाचे मन शिकण्यासाठी तळमळत होते. इतर मुले शिकत असलेली बघून त्यांना बेचैन होत होते. आईचा शिक्षणाला अप्रत्यक्ष पाठिंबा होता. पण वडिलांच्या पुढे ती काही करू शकत नव्हती. येथे ग्रामीण भागात कुटुंबात कुटुंब प्रमुखाचे असणारे वर्चस्व, पुरूषप्रधान संस्कृती दिसून येते. लेखक आईला घेऊन दताजीराव देसाईकडे गेला त्यांचा गावात दबदबा असल्यामुळे वडिल त्याला दचकत असे. त्यांना सगळी परिस्थिती समजावून सांगितली. देसाईनी वडिलांना दटावून सांगितले 'आरं पोराची जात हाय, एखाद्या वक्ताला सिनेमाला जायचंच! एखाद्या वक्ताला खेळतबी -हायचंच. एवढयासाठी त्येची शाळा बंद करायचं काय कारण हाय?" [१८] यावर लेखकाचे वडील म्हणाले " जी तुम्ही म्हणता तर लावून देतो. त्याचा नाइलाज झाला होता." [१९] संध्याकाळी जेवता जेवता त्याला वडिल अटी घालतात." अकरा वाजता शाळा असती सकाळी दीस उगवायला मळयात हजर -हायला पाहिजे. अकरा वाजूस्तवर पाणी पाजल पाहिजे. मळयाकडनंच परस्परभारी शाळंला जायाचं दिसाच्या गोंडयाबरोबर दप्तर घेऊनच मळयाला यायच. साजंच शाळा सुटली की, घरात दप्तर ठेवून झटक्यानं मळयाकड यायचं नि घटकाभर ढोर चारायची. कवा मळयात कामं असतील तवा शाळंला खाडं करायला पाहिजे ....... आय काय कबुल ?" [२०] एखाद्या नोकराला घरात कामाचे वेळापत्रक द्यावे त्याप्रमाणे लेखकाच्या मनाचा, भावनांचा विचार न करता वडिल त्याला जास्तीत जास्त कामाला जुंपवून ठेवण्याचा प्रयत्न करतात. तरीही लेखक सार कष्ट झेलायची पेलायची जबाबदारी स्विकारतात.

त्यांच्या मनात शाळा शिकण्याची जिद्द होती. पाचवर्षात खोळंबलेली त्यांची शाळा पुन्हा एकदा सुरू झाली. 'पाचवी नापास' चा शेरा नावापुढे होता. ते पाचवीच्याच हजरी पटावर तसेच होते. या वर्गात असताना वसंत पाटील या हुशार विद्यार्थ्याशी ओळख झाली. त्यांच्याकडून लेखक चित्रे काढायला शिकले. ग्रामीण भागातील अनेक तरूण आपल्या दारिद्र्याशी झुंज देत कोणाकडून ना कोणाकडून काही कला अवगत करून घेत आणि शिक्षण घेण्यासाठी यातूनच पैसे कमावत. दलित समाजातील तरूण तर अनेक प्रकारच्या कला अवगत करून रस्त्यावर खेळ करून पैसे कमावून त्याचा उपयोग शिक्षणासाठी करत. कोल्हाटयाच पोर या अत्मचरित्रात किशोर तर आपल्या शिक्षणासाठी

आईने तमाशात कमावलेले पैसे तसेच स्वत:ही पडेल ते काम करून जिद्द न सोडता आपले शिक्षण पूर्ण केले.

यादवांचे न. वा. सौदलगेकर मास्तरांशी संबंध वाढत गेल्याने कविता करण्याचा नाद लागला. मास्तरांच्या प्रेरणेने त्यांनी अहोरात्र कविता करण्याचा सपाटा लावला. तु. बा. नाईक मास्तर बॉयस्काउटची चळवळ चालवत त्यांनी आदर्श बालवीर ' नावाचे पाच अंकी आणि बहुप्रवेशी संगीत नाटक लिहीले होते. स्काऊटमध्ये नकला, गाणी, पोवाडे, नाटयछटा म्हटल्यामुळे ते सर्वांना परिचीत झाले. अशा संस्कारशील वातावरणामुळे लेखकाला शाळा सोडावी वाटत नव्हती.

याच दरम्यान गांधीजीचा खून झाला. अनेक लोकांनी गावातील उच्चवर्णियांची घरे जाळली. सर्व भारतभर दंगल उसळली. याचा परिणाम ग्रामीण भागात चांगलाच झाला. उच्चवर्णियांचा जीव मुठीत घेऊन पळ काढावा लागला यातच अनेकांनी दंगलीचा फायदा घेऊन घरेच्या घरे लुटली. गरीब उच्चवर्णियांना आपले सर्वस्व गमवावे लागले. कोण एकजण कोणत्यातरी जातीतला महात्म्याचा खून करतो आणि त्याचा परिणाम सर्व जातीला भोगावा लागतो हे विदारक चित्र आपल्याला दिसून येते.

गांधीजीचा खून झालेला ग्रामीण भागातील स्त्रिया आपल्या दारिद्रयामुळे परिस्थितीमुळे कळतही नाही. कोण गांधी नावाच्या महात्म्याचा खून झाला आहे आणि त्यामुळे ही दंगल उठली आहे. एवढच ग्रमीण भागातील स्त्रियांना माहित होते. गांधीजीच्या खूनाच्या वेळेचे फोटो पेपरमधून छापून आले होते. ती चित्रे बघण्यास आडाणी तारास दिवाणजी बोलवतात "तारा ही गांधी म्हारांज्यांच्या खुनाची चित्र बघ. पुन्हा आता गांधी बघाय मिळायचे न्हाई नि चित्रंबी बघय मिळायची न्हाईत." [२१] ती चित्र बघून या स्त्रियांचा, लोकांचा सगळयांचाच थरकाप उडाला.

लेखकाला कविता करण्याचा नाद लागला होता. पिकाला पाणी पाजण्यास गेल्यावर तो कविता करत असे. एकटा असला म्हणजे लेखकाला अनेक कल्पना सुचत. त्यातूनच कविता निर्माण होत. नाईक मास्तरांमुळे त्यांनी अनेक कलामध्ये नाव कमावले होते. ग्रामीण भागात असणा-या प्राथमिक शिक्षकांच्यामुळेच अनेक मुलांना प्रेरणा मिळत होती. यातूनच लेखकासारख्या मुलांचा विकास होत होता. लेखक शाळा कधी चुकू नये म्हणून जास्तीत जास्त प्रयत्न करत होते. शाळा चुकली की लेखक वडिलांवर नाराजी दाखवी. यामुळे वडील संतापत पाठीत धपाटे मारी, शिव्या देणे ते शाळा नकोच म्हणे." लेखक नेमलेली काम कमीत कमी वेळात व्हावीत म्हणून जिवाच्या आकान्तानं ती ओढत असे नि त्यांच्यातनं मोकळा होत असे." [२२]

सहावीत वसंत पाटील या मित्राचा पहिला नंबर तर लेखकाचा दुसरा नंबर आला. सातवीत गेल्यावर परत पुस्तकाला व फीसाठी पैशाची गरज पडू लागली. आई-वडिलांना

म्हणते "घेऊन या की ई : पोराला पुस्तक सातवीच वरीस हाय त्येच. चांगल्या मार्कानं फास झालं तर कुठ तरी चांगल्या नोकरीला तरी लागंल. सांजसकाळ मळयात राबतय, त्येचा मोबदला म्हणून तरी त्येला लागतील ती पुस्तक घेउन द्या." [२३] तरीही लेखकाच्या वडिलांनी पैसे दिले नाही म्हणून लेखकाने आईला खोटच सांगून कपाटात असलेली दहा रूपयाची नोट मोडून पुस्तके आणली. हे समजल्यावर वडील सांतापले" तुझ्या आयचा तुझ्या पुस्तक घेणा-याच्या ! घर म्हणून तेवढं पैसे ठेवले हुतं मी पोटाला काय खायाच आता? व्ह काय खायाच ? काय खयाच? म्हणून दादानं मला भितीसँग लाथलायला सुरवात केली. पायात पायताण तसेच होतं, दणादण थोबाडात खात होतो नि खालन लाथा खात होतो. तोंडान कळा सहन न होऊन 'आई आई' म्हणून ओरडत होतो." [२४] आई मध्ये पडली म्हणली "आदूगर त्याला 'घेतो' म्हणून कशाला सांगितल हुतंसा ? एवढं हालात ख्याल करून शिकतय त्येला एक डावबी पुस्तक नगंत? तिनं जरा माझी बाजू घेतल" [२५] शहरातील मुलांना पॉकिट मनी म्हणून खूप पैसे देतात त्याचा हिशोबही मागत नाही. पण ग्रामीण भागातील आनंदा सारख्या अनेक तरूणांना साधे पुस्तके घ्यायलाही पैसे मिळत नाहीत. अडाणी, असुशिक्षीतपणामुळे घाणेरडया शिव्या मुलाला दिल्या जातात याचा परिणाम मुलांच्यावर होताना दिसतो. एवढा मार खावूनही लेखक शिक्षणासाठी पुढे धडपडताना आपल्याला दिसतात. ज्ञानाची आस असली की, समोर जे येईल त्याला तोंड देण्याची सहनशक्ती वाढते हेच आनंदाच्या वर्तनावरून दिसून येते 'आठवणीचे पक्षी' मधील सोनकांबळे आपल्या बहिणीची बोलणी खावून शिक्षणाची जिद्द, उमेद सोडत नाहीत.

शाळा बुडली की लेखकाच मन चुटपुटत होते. एखाद्या भूमितीतला सिध्दांत समजत आला की वडिलांनी काम सांगितल की त्यांना सर्व तेथेच टाकून त्याला उठाव लागत होत. दुपारी वडील झोपत पण लेखक व त्यांची भावंडे भर उन्हात शेतात पाला काढत असत. आळसीपणा कुटुंबात कुटुंब प्रमुख म्हणून वर्चस्व गाजविण्याची खोटी ऐट हीच यावरून दिसून येते. लेखकाची पूर्वपरिक्षा जवळ आल्याने शेतातील कामे पटापट आटपत होता. पण वडिल कुचक्या पणाने, स्वत:त्व मोकळा वेळ मिळून गावात फिरायला मिळावे म्हणून दूसरे काम सांगत असत. लेखकाने काकूळतीला येऊन मोह सांगायला सांगे. पण वडील अधिकच संतापत, इकडे शाळेत उशीर झाला मास्तरांचा मार खावा लागे पण शेतातल्या कामापेक्षा त्यांना बरा वाटत असे. शाळेतील मास्तर हे ग्रामीण भागातील मुलांच्या समस्या समजावून न घेता उशिरा येण्याच कारण न विचारता मारत असे याचा परिणाम मुलांच्यावर होताना दिसतो. पांढरपेश्या समाजातील मुलांना काही कामे नसत. त्यांच्यावर चांगल्या प्रकारचे संस्कार कुटुंबात केले जात. खायला, पियायला

व्यवस्थित मिळत. त्यामुळे वेळेवर शाळेत येत व जात. मात्र ग्रामीण भागातील थोडयाच मुलांच्या वाटयाला असे जीवन येते.

अभ्यासाला वेळ मिळत नव्हता म्हणून लेखक म्हणतात "पाण्याकड जाताना दप्तर बरोबर असायच. चि-याला पाणी मोडलं की, चि-याच्या मध्यावर कोरडया जागेत अभ्यासाच पुस्तक उघडून त्याच्या दोन्ही बाजूंना दोन दगड ठेवत असे नि वाकु-याला पाणी मोडून वाकुंर भरेपर्यंत पुस्तक वाचत असे. वाकुंर भरल की पुन्हा दुसऱ्या वाकु-याला पाणी मोडून पुस्तकाकडे येत असे. साधारणपणे दोन दोन मिनिटांचा वेळ मिळत असे. त्या दोन मिनिटात माझ्या फे-या पुस्तकाकडून वाकु-याकडं नि वाकु-याकडन पुस्तकाकडं होत. तेवढया वेळात जे काही वाचून होई तेवढंच पदरात पडे. मात्र पुस्तकाला हात लावता येत नसे." [२६] जिद्दीने शिक्षण घ्यायचे तर अनेक अडथळे ग्रामीण भागातील तरूणांना येत होते. 'आठवणीचे पक्षी' मधील प्रल्हाद चे-याला बहिणीकडे राहयला असताना आपला भार बहिणीवर पडू नये म्हणून शाळा सुटल्यावर जमेल ती कोणती ना कोणती कामे करायचा व काम करून जो मोबदला मिळेल तो बहिणीजवळ देताना दिसतो. अशी ग्रामीण भागातील तरूणांची शिक्षण घेताना फरफर होत होती पण जिद्दीने शिक्षण पूर्ण करण्याचा त्यांचा निर्धार असलेला दिसून येतो. अभ्यासालाही त्यावेळी घरातील दारिद्रयामुळे, परिस्थितीमुळे लाईट नसल्यामुळे ही मुले कोठे रस्त्यावरील लाईट खाली बसून अभ्यास करत. कोणत्याही व कोठेही वेळ मिळेल तेथे ही ग्रामीण भागातील मुलं अभ्यास करत. अतोनात कष्ट, हालअपेष्टा सहन करून अभ्यास करत. लेखक तर ऊसाला जे वाकुरं करतात त्यावर पुस्तक ठेवून पाणी पाजता पाजता अभ्यास करताना दिसून येतो, यातूनच त्यांची जिद्द, चिकाटी आपल्याला दिसते.

वडिलांचा शिक्षणाला विरोध असतो तरी लेखक शाळेला जायचा हट्ट करतो, म्हणून मोट लवकर सोडत नाहीत. शेजारच्या मळयातली मोट सुटून अर्धा तास होतो, लेखकाच्या पोटात काही नसल्यामुळे त्याचा जीव रडकुंडीला येतो. त्याचवेळी त्यांच्या मनात जीव देण्याचा विचार येतो. लेखक मोठयाने आक्रोश करत ओरडतो, "सोड की गाड मोट आता ऽ ऽ " [२७] आणि सरळ गावाची वाट धरतो. दुपारी एक वाजता शाळेत पोहचल्यावर नविन शिक्षक आले हाते. त्यांना लेखकाची परिस्थितीविषयी माहिती होती. त्यांनी त्याच्या पाठीवरून हात फिरवत म्हणाले." कितीही उशीर झाला तुला शाळेत यायला तरी येत जा ......... संध्याकाळचे चार वाज्ले असले तरी चालतील पण शिक. ध्येयाची पूर्तता कर." [२८] गुरूजीच्या या बोलण्याने लेखकाला भरून आले "हुंदके अधिकच अनावर झाले नि मी चक्क रडू लागलो. तोंडावर कुडत्याचा पुढचा भाग घेऊन डोळे पुसू लागलो. तोंड लपवू लागलो." [२९] शिक्षक समजूत काढत म्हणाले "रडू नको जातील हेही दिवस. खाली जा नि तोंड धुऊन ये" [३०] शिक्षण घेतो आहे म्हणून

मुलाचे कौतुक न करता त्याला शिक्षणापासून कसे परावृत्त करता येईल यासाठी वडिलांची धडपड दिसते तर सर्व कामे वेळेवर करून जास्तीत जास्त वेळेत शाळेत हजर राहण्याची धडपड लेखक करताना दिसतो. यादवांसारख्याच 'उपरा' मधील लक्ष्मण मानेंना प्रथम शिक्षणाला वडिलांकडून प्रेरणा मिळते पण नंतर पोरगं कांडं वाजवत नाही. जातीचे रीती-व्यवहार त्याला कळत नाहीत. म्हणून चौथीनंतर लक्ष्याच्या शिक्षणाला विरोध होतो. यादवांच्या वडीलांचा शिक्षणाला विरोध हा परंपरागत कल्पनेतून घरातील आर्थिक परिस्थितीमुळे अडाणी, आडमुठेपणामुळे आला आहे. तर लक्ष्मणच्या वडिलांचा विराधही रूढी परंपरामधूनच आलेला आहे. कैकाडयाचा जन्मा फोक कापण्यासाठी, काडं वाजविण्यासाठी ही त्यांची श्रध्दा आहे. शाळेत वेळ झाला म्हणून यादवांना समजून घेणारे शिक्षकही होते. अशा शिक्षकांच्यामुळे दारिद्रयाने पिछाडलेल्या तरूणांच्या शिक्षणाला प्रेरणा मिळत होती. 'काटयावरची पोर' मधील उत्तम तुपे यांना सावळकर गुरूजींनी केलेली शिक्षणासाठी मदत 'गबाळ' मधील कुडमुडे जोशी यांना शिकायला प्रोत्साहन देणारे बावचीचे लाड गुरूजी, हेडमास्तर यांची मदत त्यांना मोलाची ठरली. मुलाच्या शिक्षणत वारंवार अडथळे आणाणरे वडिलांचा आक्रस्ताळेपणा, आडाणीपणा, मुलांच्या मनावर परिणाम करणारा आहे. यावरून पालकांची मुलांवर दादागिरी करण्याची प्रवृत्ती दिसून येते.

गु-हाळाच्या पूर्वतयारीत लेखकाचे पंधरा दिवस शाळेला खाडे पडले. गु-हाळाचे काम खूप जिकरीचे असते. गु-हाळावर काम करणा-या लोकांचे जीवन अतिशय खडतर, हालाखीच असते. अनेक जाती-जमातीचे धर्माचे लोक एकत्र येऊन एका जीवाने काम करत असतात. ऊस गाळयापासून ते गुळाच्या ढेपा पाडेपर्यंत विविध प्रकारची काम या लोकांना करावी लागतात. अशा विविध छोटया मोठया कामात यादवांच्या वडिलांनी त्याला जुंपले होते. परीक्षा जवळ आल्याने सर्व मित्र अभ्यासाला लागले होते. कामे बुडवून लेखक शाळेत जातो. म्हणून वडील त्याला भर चौकात मारतात. ग्रामीण भागातून येणारा हा प्रतिनिधक अनुभव आहे. स्वत: खुप काम करतो आहे. असे सर्व समाजाला दाखवून मुलाला मारणे मग तेथे समाज, घर पाहिले जात नाही. सौंदलगेकर मास्तरांच्या सांगण्यावरून लेखकाला वार्षिक परिक्षेच्या अगोदर दोन नेमाने शाळेत पाठविले जाते. स्वत:चा निर्णय न घेता येणा-या माणसाचे हे दु:ख आहे. दुस-याने समजून सांगायचे ते ऐकून निर्णय घ्यायचा हा यादवांच्या वडिलांच्या स्वभाव आहे.

शाळेच्या वाढदिवसाच्या वेळी महत्वाच्या ठिकाणी लेखकाची नेमणूक केली. गाणी, नकला, नाटय छटा, पोवाडा अशा नाना अभिनयाच्या कला अंगात असल्यामुळे सांस्कृतिक कार्यक्रमात त्यांना महत्वाचा भाग उचलावा लागला. अनेक कलांची नैसर्गिक देणगी ग्रामीण भागातील तरूणांना लाभल्यामुळे अशा तरूणांचे वेगळे व्यक्तिमत्व शालेत निर्माण होत

होते. याला प्रेरणा देणारे ही प्रामाणिक शिक्षक शाळेत असल्यामुळे ते फुलून ते फुलून येत होते.

अनेक हालअपेष्टा, कष्ट सहन करत सातवीची परिक्षा दिली. 'पुढारी' वर्तमानपत्रातन लेखकाचा तालुक्यात प्रथम क्रमांक आला महणून नाव छापून आले. पण पेढे वाटायलाही पुरेसे पैसे नव्हते ही ग्रामीण भागातील तरूणांचं शोकांतिका आहे. घरच्या हालाखीच्या परिस्थितीमुळे काम केले. तरच रात्री जेवण मिळे. त्यातच अभ्यास करायला वेळ मिळत नसे. पण जिद्द, चिकाटीमुळे नंबर काढायचा पण नंबर आला तरी घरी कौतुक मात्र होत नसे. मात्र श्रीमंत घरातील मुलांचा मात्र नंबर आला तर सर्व गावभर पेढे वाटले जात. त्याचे खुप कौतुक केले जात. सातवी सात झाल्यावर वडिलांनी नोकरी बघण्याचा सल्ला दिला. पण कमी वयामुळे नोकरी मिळाली नाही. पुन्हा सतत कष्ट करीत राहयला लागणे ही त्याच्या जीवनाची सूत्रे बनलेली आपल्याला दिसते.

लेखकाचा मित्र वसंत पाटील याचं शिक्षण थांबल तो आजीजवळ रहात होता. त्याची आई लहानपणीच वारली होती. वसंत सारख्या असंख्य ग्रमीण, हुशार, बुध्दीमान तरूणाच शिक्षण आई-वडील नसल्याने दारिद्रयाने पछाडल्यामुळे थांबवाव लागल. पण त्यांच्या अंगी निसर्गत: असलेल्या कलामुळे ते तिकडे वळले. वसंत पाटील थिएटरमध्ये स्लाईड बनवून देई. त्याच पाहून लेखकही सिनेमा बघण्याच्या वेडापायी स्लाईड बनवून देऊन सिनेमा फुकट पहात असे. लहानपणीच मौज म्हणून त्यांना करता आली नाही. मनसोक्त आनंद घेता आला नाही. त्यासाठी मार मात्र सतत खावा लागत असे. 'झोंबी' च्या प्रस्तावनेत पु. ल. देशपांडे म्हणतात, " आनंदा दरिद्री जीवनात आपल्या बालवयातल्या ज्या काही हौसा मौजा होत्या, त्या पुरवायला कधी ते जुगाराच्या अड्डयावर रंगला, कधी विडयाची धोटकं गोळा करून फुंकली, कधी फिरत्या सिनेमाच्या तंबूत कापडाच्या फटीतून चोरून सिनेमे पाहिले. तर कधी पुस्तक विकत घ्यायला चक्क चो-या केल्या". पांढरपेशीतील मुलं आपलं शिक्षण आरामात काही कष्ट न करता पूर्ण करतात मग त्यांचे नंबर न यावेत तर नवलच पण अतोनात कष्ट करून रात्रंदिवस हालअपेष्टा सहन करून नंबर मिळविण्यात जो आनंद आहे तो आरामात शिक्षया घेऊन नंबर येणे यात नाही.

मास्तरांच्या प्रेरणेमुळे त्यांना कविता करण्याचा नाद लागला. कविता करत असताना ते कथा, कादंब-याचे वाचन करत होते. मुलगा शाळेचा नाद सोडत नाही. म्हणून वडील त्याचे लग्न करण्याचे ठरवतात. वडिलांचा आडमुठेपणा येथे दिसून येतो. ग्रामीण भागातील तरूणांची अशी अवस्था आहे. नोकरी मिळाली नाही. पंधरा ते वीस वय झाल की वडील लग्न करण्यास तयार होतात. आई-वडील म्हणतील त्याच्याबरोबर लग्न करावे लागत होते. पण लेखकाच्या उलट बोलण्यामुळे हा लग्नाचा प्रसंग टळतो.

घरातील गरीबीमुळे, परिस्थितीमुळे विकत घ्यायला पुस्तके नसतात अशावेळी श्रीमंत मुलांच्या घरातील अथवा शेजारांच्या घरात मिळतील ती पुस्तके लेखक वाचत होता.

सणगर मास्तरामुळे ड्राईग परीक्षेला 'ए' ग्रेड मध्ये लेखक पास होतो. दुसरी ड्राईगची परीक्षा बहिण आनसाच्या मृत्यूमुळे बुडते. सणगराचा आबाजी आठवीत गेल्यामुळे त्याच्या घरी जाऊन लेखक त्याची पुस्तके वाचीत होता. आबाजीकडून त्याने ए.बी.सी. डी आठ दिवसात शिकून घेतली इंग्रजी आठवीच्या अभ्यासाला लागले. मार्च महिन्यात हायस्कूलच्या हेडमास्तरांना भेटून त्यांना सर्वपरिस्थिती सांगितली त्यांनी कौतूक करून परिक्षेस बसण्यास परवानगी दिली. लेखक महणतात, " एप्रिल महिन्यात आठवीची परीक्षा देऊन मी नावा घातलेल्या 'ब' तुकडीत पास होऊन पाहिला आलो. हे कस काय घडल याच माझ मलाच आश्चर्य वाटल. वर्षभर अभ्यास केलेली पोरं नुसती पास नि माझा मी अभ्यास करूनही पहिल्या नंबरानं पास. देवाचे उपकार मानून मी मळयात पुन्हा कामात लागलो. हायस्कूलच्या पहिल्या स्पर्शानं आतबाहेर मोहरून गेलो." [३२] ग्रामीण भागातील अनेक तरूणांना शाळेच्या हेडमास्तर शिक्षकांच्या मदतीमुळे, प्ररणेमुळे पुढील शिक्षण घेता आले. शाळेत जाण्यास शेतातील कामामुळे वेळ मिळत नसला तरी शिकण्याच्या जिद्दीने हुशार विद्यार्थ्यांकडून इंग्रजी शिकुन घेणे व जास्तीत जास्त ज्ञान आत्मसात करण्याचा प्रयत्न करताना लेखक दिसतो. वर्षभर काही काम न करता फकत अभ्यास करूनही मुलांचा नंबर येत नाही. पण वर्षभर शेतातील जीवघेणे कष्ट करणे मिळेल त्यावेळेत अभ्यास करणे त्यातून पहिला नंबर येणे यातच खरा आनंद आहे आणि तोच लेखकाच्या वाटयाला आला आहे.

लेखक नववीत शाळेत जायला लागला तेव्हा अभ्यासक्रम पुढे गेला होता. अक्कोळकर सर कडक होते. त्यांनी सलग तीन दिवस गैरहजर राहिल्यास नाव काढून टाकले जाईल असा दम लेखकाला दिला. साडेतीन महिन्यांची साडे सतरा रूपये फी ताबडतोब भरण्यास सांगितली. अक्कोळकर सर लेखकाबरोबर नीट वागत नाहीत. त्याचा पदोपदी अपमान करताना दिसतात. क्लार्कने हेडमास्तरांचे कान भरल्यामुळे तर पहिले सहा महिन्याची फी माफ झाली नाही. अक्कोळकरच्या सारखे अहंमगंडांने पछाडलेली उच्चवर्गीय शिक्षक त्यावेळी शाळेवर मुलांना शिकविण्यासाठी होते. 'अक्करमाशी' मधील शरणकुमार लहानपणी शाळेत असताना वनभोजनासाठी जातात. त्यावेळी शिक्षक त्यांना सवर्ण मुला-मुलीचे उरलेले उष्टे अन्न खायला देतात. शाळेत काही चुकले की मास्तर शरणवर रागवायचे शिव्या द्यायचे. बैल खाता येतात का? म्हणून हिडीसपिडीस करायचे. तर 'आठवणीचे पक्षी' मधील सोन कांबळे हुरडा खायला शेतात गेल्यावर गुरूजी जवळ घेतात पण तेथील माळी त्यांना जात दाखवून देतो. 'बलुत' मधील दया पवार यांनाही शाळेत असताना शिक्षक मर्यादांची जाणीव करून द्यायचे. उच्चवर्गीय मास्तरांच्या घरी गेले

की ते दारातच उभं करत. 'उपरा' मधील लक्ष्मणला पहिल्याच दिवशी मास्तर भिका-याला शाळा नसते म्हणून लक्ष्मणला डावलताना दिसतो. 'तराळ-अंतराळ' मधील शंकर वाण्या ब्रम्हणांच्या पहिल्या रांगेत बसल्याने शाळा विटाळली. म्हणून उच्चवर्णीय मास्तर शंकरला मारताना दिसतात. यावर उच्चवर्णीय मास्तरांचे असणारे शाळेवर वर्चस्व दिसून येते. शिक्षणासारचख्या पवित्र ठिकाणीही ही मंडळी जातीयवाद आणताना दिसतात.

यादवांना पाटील मास्तरांनी स्वखर्चाने परिक्षेला बसविले मात्र पैशासाठी सर्टिफिकेट अडकून ठेवलं. त्यासाठी लेखकाला बाडक्यांचे भारे कापून बाजारात विकून वडिलांना माहित न होता फी भरून सर्टिफिकेट मिळवावे लागले. पास होण्यापेक्षा लेखकाला खरा आनंद अक्कोळकर मास्तरांच्या चरकातून सुटण्याचा होतो. काही शिक्षक आपल्याला त्यांच्या कर्तृत्वामुळे, शिकविण्याच्या वेगळया पध्दतीमुळे आठवणीत राहतात पण काही मास्तर त्यांच्या हुमदांडग्या अडाणीपणामुळे लक्षात राहतात.

लेखक पुस्तके, वहया, फी भागविण्यासाठी शेंगा, गवत, शेतातील बाटके इत्यादीची चोरी करून विकु लागतात. तसच पि-या बन्न्याचं तंबाखुचं तरू लेखक व त्यांचा मित्र बाबु चोरतात. वडीलांना सुगावा लागतो. पण सर्व मित्रावर घालून लेखक मोकळा होतो. सवर्ण वर्गातील मुल चोरी चैनीसाठी करताना दिसतात तर येथे लेखक शिक्षणासाठी चोरी करताना दिसतो. याला चोरी म्हणावी का? यातूनच शिक्षणात गळती निर्माण होण्याची शक्यता असते.

शिक्षणाला मदत मिळावी म्हणून लेखक करमणूकीचे कार्यक्रम करतो. त्याला मराठी शाळेतून प्रोत्साहन मिळते. परंतु कोल्हापूर हायस्कूलमधील मुख्याध्यापकांनी त्याची उलट तपासणी घेतल्यानी त्यांनी तो मार्गच सोडून दिला. कष्ट करून शिक्षण घेतानाही त्यातही अशा खुळसट व्यक्ति अडथळे आणत होते. अनेक वैद्य-अवैद्य मार्गांनी लोक पैसे मिळवित असतात. त्यांना विचारणारे कोणीही नसते. पण शिक्षणासाठी आपल्या अंगातील कला शाळेत प्रामाणिकपणे करून पैसे मिळवितानाही त्याला विरोध करणा-या व्यक्ति हया पांढरपेशातीलच आहेत.

लेखकाच्या शिक्षणाला वडीलांचा विरोध असला तरी आईचा मात्र अप्रत्यक्षरित्या पाठिंबा होता. शेतात राबूनही खायला चांगल मिळत नाही. म्हणून लेखकाला आई म्हणते, " आन्दा, जिवाच किती हालहाल करून घेशील? एवढ जीव जासस्तर राबून बी उपाशीच शाळेला जातोस, काय मिळतय शाळत ? पेटीव की आत ती शाळा नि जिवाला जप जरा. सारं अंगावरच मांस कावळया कुत्र्यानी बरबडून न्हेल्यागत झालय ते कवा घड हुणार तु? [३३] आईचं मुलावर असणारे निरपेक्ष प्रेम यातून दिसून येते. तिला मनातून मुलगा शिकावा असं वाटतं पण अडाणी नव-यापुढे तिचे काही चालत नव्हते. ही ग्रामीण भागातील स्त्रियांची मोठी समस्या होती.

एस. एस. सी. त गेल्यावर 'फी' साठी लेखकाला पैसा जमा करावा लागतो. तो कंत्राटी काम होतो. पण ती अंगावर येतात. घराच्या अनेक समस्यामुळे लेखकाला 'फी' साठी झागडावे लागले. अतोनात कष्टामुळे त्याच्या अंगात कनकन भरते. त्यामुळे कामही करता येत नाही. एवढया कामातूनही ते सौदलगेकर मास्तरांच्या घरची कवितेची पुस्तके वाचून मनाला विरंगुळा करून घेत होते. गिरीश, यशवंत, चंद्रशेखर यांची जानपद कविता वाचल्यावर त्यामधील अपूर्णता त्यांना जाणवत होती. म. फुले यांचे 'शेतक-यांचा असूड' यात शेतक-यांच्या स्थितीचे केलेले वास्तवपूर्ण चित्रण आंबेडकर यांनी केलेले दलितांचे वास्तव चित्रण, "माटयांनी ग्रामीण भागातील दलितांचे चित्रण पांढरपेशा समाजाचे उपेक्षितांच्या जीवनाकडे लक्ष वेधून घेण्याकरिता केले पण माटयांना संघर्षापेक्षा सुधारणेची तळमळ अधिक होती. तर कर्मवीर भाऊराव पाटील यांनी प्रत्यक्ष कृतीनेच खेडोपाडी शाळा नेण्यासाठी जीवाचे रान केले. सर्व जाती धर्माची मुल त्यांच्या शाळेत शिकू लागली. [३४] यशवंतराव चव्हाण यांनी कराडला इंजिनिअरिंग कॉलेजची स्थापना केली. ती खेडयापाडयातील गरिबांची मुल शिकावी त्यांचे दारिद्रय नष्ट व्हावे. यासाठी पण आज मात्र वेगळ चित्र दिसून येते.

यादव शेतात काम करता करता जे ज्यांना भावलं त्याचे वास्तव चित्रण आपल्या कवितेत करत अशा अनेक कविता करून त्यांना 'हिरवं जग' असे नाव देऊन त्याची एक वही तयार केली. साहित्यात इतर लेखकाप्रमाणे ज्यांनी स्वत: हालअपेष्टा जीवन भोगल नाही ते तसच मांडू शकणार नाहीत. पण ज्यांनी अनेक हालअपेष्टात कष्टात जीवन भोगलं तेच साहित्यात वास्तव चित्रण करू शकतील. पुढारी, सकाळ, लोकसभा सारखी वर्तमान पत्रामुळे खेडोपाडी जगातील घडामोडीच ज्ञान देण्याच कार्य त्याकाळी केले तर भूदान, नवयुग नियम कालिकांनी त्यावेळच्या ग्रामीण तरूण पिढीच्या मनात आपल वेगळ स्थान निर्माण केले. या नियतकालिकेत व वर्तमानपत्रांचाच परिणाम लेखकाच्या मनावर झालेला दिसून येईल. यातूनच अत्रे, जोशी, गोरे यांच्या कार्याविषयी लेखकाच्या मनात आदर निर्माण झाला.

एस. एस. सी. चे जुनी पुस्तके अर्ध्या किंमतीने काही फुकट मित्रांच्या आई-वडिलांना सांगून लेखकाने मिळविली. जुन्या वहयांच्या कागदापासून वहया तयार करून त्याने वापरल्या. महत्वाचे वर्ष म्हणून लेखक जिद्दीने कामाला लागला होता. आजही ग्रामीण भागातील मुलांना आर्थिक परिस्थितीमुळे नवीन पुस्तके वहया घेता येत नाहीत. अशावेळी जुनी पुस्तके घेऊन वहया वापरून वेळ मिळेल तेव्हा अभ्यास करून ही मुले शिकत होती.

एस. एस. सी. चे महत्वाचे वर्ष म्हणून लेखक शाळेला निघाला वडिलांचा नेहमीप्रमाणे विरोध झाला पण तिकडे दुर्लक्ष करून ते निघाले तेव्हा "दादानं मानगूट

पकडत, झटापट सुरू झाली नि दादाची पायताण अंगावर डोईवर तोंडावर पडू लागली. त्या गडबडीत माझा कुडतं पाठीवर किसल, पळायला गेलो तर पाठीमागन पेकटात लाथ बसली नि तोंडघाशी पडलो. अतिशय चिडलेला दादा फडाफडा वरन डोक्यात पायताणं मारू लागला". [३५] मोठयाने ओरडून म्हणाला "जा ऽ शाळंला जा ऽ शाळंला. तुझ्या आयला तुझ्या किती सोसायच तुझं मी? कुणीकुणीकडं मी एकट बघू? [३६] यातून वडीलांचा निष्क्रियपणा दिसून येतो. मुलाच खूप शिकला म्हणून कौतूक न करता उलट आपणच खूप काम करून याला शिकविले याचा आव आणण्याचा प्रयत्न करताना दिसतो. शाळा सोडून शेताकडे मुलाने लक्ष दिले म्हणजे आपण फिरायला मोकळे हाच हेतू वडिलांच्या मनात असलेला दिसून येतो.

शिक्षणासाठी सारख मार खाणे, 'फी' साठी शाळेत शिक्षकांचा मार खाणे यामुळे असहय होऊन लेखक कोल्हापुरला नोकरीच्या शोधात निघून जातो. कोल्हापूरातील अनेक नामवंत उद्योगधंदेवाले, शिक्षणसंस्था, चालकांना भेटतो पण कोणी नोकरी देत नाही. येथेही जातीव्यवस्था आपल्याला दिसून येते. मोठे मोठे श्रीमंत आपल्या भाषणातून गरिबीविषयी बरेच काही बोलत असतात. प्रत्यक्षात मात्र त्यांची कृती शून्य दिसून येते. साधा गेटवरील शिपाईही लेखकाची हेळसांड करताना दिसतो. भूक लागली म्हणून कचराकुंडीतील, आंब्याच्या व केळयाच्या साली त्यांना खाव्या लागल्या. 'जिणं आमुच' मधील बेबी कांबळे तर रोगराईने जनावरे मरत त्याचं मांस साफ करून अर्धकच्च खात होत्या. 'उचल्या' मधील लक्ष्मण भूकेसाठी उष्टया पत्रावळया गोळा करून त्यातील अन्न खाताना दिसतो. 'आठवणीचे पक्षी' मधील सोनकांबळे गावात एखाद जनावर मेल तर त्याच्यावर मांस गोळा करण्यासाठी तुटून पडताना दिसतात. शिक्षणासाठी अनेक त-हेचे हालअपेष्टा सहन करून ग्रामीण भागातील सवर्ण दलित तरूण जिद्दीने शिक्षण पूर्ण करत होते. परिस्थितीपुढे न झुकता पडेल ते काम करून अन्नाचे चोचले न पुरवता शिकत होती.

गोपातात्याच्या संगण्यावरून लेखक घरी येतो. शाळेत जाऊ लागतो. मुलाला परत त्रास दिला तर निघून जाईल म्हणून वडिल त्रास देत नाहीत. व्यवस्थितरित्या अभ्यास करून लेखक एस. एस. सी. पास होतात.

आत्तापर्यंत केलेले कष्ट, उपासमार, दादाचा मार यातून शिकण्याची जिद्द, शिक्षकांची प्रेरणा यामुळे लेखकाला गोड फळ मिळते. त्यांनी दारिद्रयाच्या चिखलातून बाहेर पडून स्वतःचा मार्ग स्वतःच पार केला.

सामान्य कुटुंबात जन्माला येऊन शिक्षणासाठी जी झोंबी घेतली अखेर त्याची एकटयाची ठरत नाही. ग्रामीण समाजात अजून कितीतरी असे आनंद यादव आपल्या घरच्या परिस्थितीमुळे शिकू शकत नाहीत. यादवांची जिद्द व वेळोवेळी त्यांना मिळालेली प्रेरणा यामुळेच त्यांनी आपली एस. एस. सी. पर्यंत शाळा पूर्ण केली. 'एक होता

कार्व्हर' मधील कार्व्हर आपले जीवन स्वतःच घडवत जाताना दिसतो. अतोनात कष्ट करून येईल त्या संकटाला तोंड देत आपली प्रगती करताना दिसून येतो. मुलाची शिक्षण घेण्याची जिद्द असते पण वडीलांचा अडाणीपणा, स्वभावदोषामुळे, अज्ञानापोटी, आळसामुळे मुलाला शिक्षणासाठी संघर्ष करावा लागतो.

'झोंबी' ही ग्रामीण जीवनातील निम्नस्तरीय वर्गात असलेल्या प्रचंड दारिद्रयाची कहाणी घेऊन आलेली आहे. दैन्य, दारिद्रय, उपासमार, सतत कष्टमय जीवन जगत असताना समोर भाकरीचा प्रश्न सतत हिंदोलत असतो. समाजात शिक्षणाला पुरेसे महत्व नसते त्याच्यामागे पेटाचा प्रश्न भेडसावत असतो. रूढी, परंपरा, श्रध्दा, अंधःश्रध्देमुळे अनेक मुल होतात ही देवाची कृपा मानणारा समाज त्याच्यापोटी वारेमाप मुल होतात. यामुळे दोघांच पोट भरण्याचा प्रश्न असतो. अशावेळी अनेक मुल असल्यामुळे कुटुंबाची फरफट होते. त्यात सर्वजण पिळून निघत असतात. आजही या परिस्थितीत फारसा पालट झालेला आहे असे नाही.

शाळा शिकणे म्हणजे कुळाला बटा लावणे असे मानले जायचे. त्या समाजात जन्माला आलेल्या आनंद यादवांसारख्या मुलाने मॅट्रिक होणे आणि ज्या समाजात मुलाने शाळेत जाणे ही नैसर्गिक घटना मानली जाते अशा ब्राम्हण किंवा तत्सम वर्गातल्या मुलाने मॅट्रिक होणे यात फरक आहे. वडिलांचा विरोध सहन करून खूप मार खावून काही शिक्षकांचा विरोध तर काहीच्या प्रेरणेमुळे, प्रेमामुळे कोठेही कमी न पडता लेखकाने जिद्दीने शिक्षण पूर्ण केले. 'झोंबी' ही आनंद यादवांची कहाणी न राहता दारिद्रयात खितपत पडणा-या समाजाची नेतृत्व, चित्रण करणारी आहे.

## नांगरणी

घराबाहेर पडून महाविद्यालयीन शिक्षण मोठया जिद्दीने व उमेदीने पुरे करणा-या संवेदनशील युवकाची ही उत्कंठावर्धक आत्मकथा :

एस. एस. सी. चा रिझल्ट लागला. चांगल्या मार्कांने लेखक पास झाले. पण घरी त्यांचे कौतुक झाले नाही. उलट शिक्षणाची कटकट मिटली आता नोकरी बघ असे सर्वजण म्हणू लागले. याउलट भारती विद्यापीठाचे संस्थापक डॉ. पतंगराव कदम यांनी आपल्या भाषणात एक आठवण सांगितली. मुंबई मधील वाळकेश्वर येथील श्रीमंत घरातील एक मुलगी बोर्डात आली. त्यावेळी हार व पेढे घेऊन कदम साहेब त्या मुलीचे अभिनंदन करण्यास गेले तेव्हा त्यांनी त्या मुलीला तिच पुढील अपेक्षाविषयी विचारले असता ती मुलगी म्हणाली "मला भारत सोडून अमेरीकेत वास्तव्य करायचे आहे. व तेथेच पुढील शिक्षण घ्यावयाचे आहे. यावरून यादवांची व त्या मुलीच्या आर्थिक

परिस्थितीमध्ये असलेला फरक दिसून येतो. लेखक मास्तरांचा सल्ला घेण्यास गेले तेव्हा त्यांनी त्यांना प्रोत्साहन न देता कारकून किंवा हिशोबनीसाची नोकरी करण्यास सांगितले पण त्याच वेळी तेथे आलेल्या उच्चवर्णीयांच्या मुलांना मात्र वेगवेगळया शाखेत प्रवेश घेण्यास सांगितले.

कोल्हापूरला नोकरी शोधण्यासाठी लेखक गेले. तेथे भालजी पेंढारकर, बाळ गजवर भेटले पण त्यांना नोकरी मिळाली नाही. त्यांना शाहु महाराजांनी बोलावून घेऊन पुरस्कार दिला होता. त्या भाई माधवराव बागल यांनी लेखकाला सज्जनपणाने नोकरी मिळते का म्हणून मार्गी लांवले. तरी ही या ध्येयवादी लेखकाने आपला मार्ग सोडला नाही.

वीस जूनला महाविद्यालय सुरू होणार होते. लेखकाचा जीव तळमळत होता. 'भूदान', 'साधना' ही साप्ताहिक वाचून त्यांच मन चळवळीकड ओढ घेऊ लागल यामागे त्यांचा हेतू गरीबी नाहीशी करणे हा होता. बापूसाहेब सुतार यांच्याशी भूदान चळवळीत जाण्यासाठी प्रयत्न केला. दौलतराव निकम यांनी लेखकाची परीक्षा घेतली. शेवटी रत्नागिरी येथे सर्वादय छात्रालयात पाठविण्याचा निर्णय िकम साहेबांनी घेतला. घरात कोणाला काही न सांगता फकत मामाला सांगितले. मामा, आबाजी, विठोबा यांनी पैसे देऊन जाण्याची व्यवस्था केली. रत्नागिरीला रात्री पोहचल्यावर रेल्वेत ओळख झालेल्या देवधरांच्या घरी राहिलो सकाळी त्यांच्या भावाने छात्रालयात पोहचविले. तेथे व्यवस्थापकांनी सेक्रेटरी आबाला बोलावून तुकारामच्या खोलीत राहण्याची सोय केली. कोल्हापूरच्या शरद जोशीची ओळख तिचे झाली. कोकणात असणार टिळकांच घर पाहिल आणि मनात मोठमोठया लोकाचें जीवन चरित्र डोळयापुढे आले आणि यातून शिकण्यास प्रेरणा मिळत गेली. छात्रालयात गुरूजींनी सर्वांच्या ओळखी करून दिल्या. फीचा प्रश्न पून्हा मनात घोळू लागला. कॉलेजच्या प्राचार्यानी अर्धी फी माफ केली पण अर्ध्या फी चा प्रश्न पून्हा उभा राहिला.

कॉलेजमध्ये रा. वा. चिटणीस या मराठी विषयाच्या प्राध्यापकांशी ओळख झाल्यावर त्यांनी बा. सी. मर्ढेकर, मंगेश पाडगावकर, प्र. शि. रेगे, विंदा करंदीकर, सदानंद रेगे, इंदिरा संत, शरच्चंद्र मुक्तिबोध यांची कविता वाचण्यास सांगितली. 'सत्यकथा' मासिक नेमान नेमान संपूर्ण वाचण्यास सांगितल. त्यांनी आपल्या संग्रहातील अनेक पुस्तके वाचण्यास दिली. यामुळे लेखकाला प्रेरणा मिळत गेली. ग्रामीण भागातील लेखकासारखे सर्वच मुल हुशार, बुध्दिमान असतीलच असे नाही. सामान्य बुध्दिच्या मुलांनाही लेखकासारखी प्रेरणा देऊन शिकण्यास प्रोत्साहन दिले तरच ग्रामीण समाजातील मुलांचा विकास होईल. प्रा. चिटणीसांनी लेखकाने लिहिलेल्या कवितेचे वही भावे सरांना देण्यास सांगितली त्यातील सर्व कविता ग्रामीण स्वरूपाच्या होत्या.

कॉलेज करत असतानाच वर्गात हुशार मुलमुली कशा वागतात याचा प्रत्यय त्यांना येतो. वर्गात अतिशय बुध्दिमान, अभ्यासू असणारी मुलगी लेखकाला आपला प्रतिस्पर्धी नाही ना याची चाचपणी अतिशय हुशार पध्दतीने करताना दिसते. ही प्रवृत्ती जासत प्रमाणात श्रीमंत मुली - मुलांमध्ये दिसून येते. लेखकाला मात्र मुलींनी आपल्याशी बोलाव अस कधी वाटल नाही. ते त्यांच जग वेगळ व आपल जग वेगळ मानत. ते समुद्रावर फिरायला गेले की मंगेश पाडगावकर, इंदिरा संत यांच्या भावव्याकुळ कविता वाचून त्यांचे मन अधिकच काव्यात्म नि उत्कट संवेदशील होत होते.

लेखकाने कागलला पत्र पाठविल्यावर वीस रूपयाची मनिऑर्डर आली. आई-दादा व निकम साहेबांनी वर्गणी गोळा करून पाठविले होते. कर्मवीर भाऊराव पाटील यांनीही अनेक मुलांना वर्गणी गोळा करून उच्च शिक्षणासाठी परदेशाला पाठविले होते. अशा वर्गणीच्या पैशावरच अनेक मुलांनी आपल शिक्षण पुर्ण केले. छात्रालयात असताना प्रत्येक विद्यार्थ्याला संडासे स्वच्छ करण्याचे दिवस नेमून दिले होते. यामुळे विद्यार्थी नाराज होत म्हणून सर्व दिवस संडासे लेखक स्वत: स्वच्छ करू लागला. पण मुल चिडवू लागल्यामुळे स्वत:वर वेळ येईल तेव्हाच संडासे स्वच्छ करू लागले. मित्र तुकाराम घरी गेल्यामुळे खोलीत एकट एकट वाटत होते. त्यांना गावच्य आठवणी येत होत्या पण शिकण्याच्या जिद्दीने त्या पाठ फिरवत होत्या.

सप्टेबरचे दिवस असल्याने प्राध्यापक अभ्यासक्रम पूर्ण करण्याच्या मागे लागले होते. एके दिवशी प्राचार्य भावेंनी बोलावून घेतले आणि पु. ल. देशपांडे व सौ. सुनिताबाई देशपांडे यांची ओळख करून दिली. पु. ल. ना लेखकाच्या कविता खूप आवडल्या ते म्हणतात 'हयांच्या घरात दारिद्रय भरपूर भरलेलं दिसतंय. त्याबद्दल त्याची तक्रार नाही. ते त्यान अगदी सहजपणे स्विकारलय त्या पार्श्वभूमीवर तो जगतोय.' [३७] शाळेत असताना डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना मास्तरांनी आंबावडेकर नाव न लावता आंबेडकर हे नाव लाव म्हणून सांगितले त्याप्रमाणे पु. ल. नी "जकाते-यादव अस नांवे लावू नका फकत आनंद यादव असच नांव साहित्यात लावा". असे म्हणून कवितेच्या वहीवर त्यांनी पेनांनी 'हिरवं जग' आनंद यादव अस लिहिल. लेखकाच्या कवितेचे भावे, पु. ल. सुनिताबाई देशपांडे या तिघांनीही खूप कौतुक केले. मुंबईला जाताना पु. ल. नी या कविता रजिस्टरने पोस्टाने आकाशवाणीच्या पत्यावर पाठवून द्या म्हणून सांगितले. त्यासाठी पाच रूपये दिले. जाताना पु. ल. म्हणाले" ... तुम्हाला तुमच्या शेतात त्या बहिणाबाईप्रामण गुप्तधन सापडलय, ते सांभाळा. शेतावर प्रेम करा. आई - वडिलांच्या पुण्याईन तुम्ही त्यांच्या पोटी जन्माला आलात त्यांना विसरू नका ... बहिणाबाईची गाणी वाचा, श्री. म. माटे, व्यंकटेश माडगूलकर, र. वा. दिघे वाचा. तुम्हाला तुमची माणस भेटल्यासारख वाटेल. गाण्याचा नाद आहे. तर शास्त्रीय पध्दतीने शिका. इथ रत्नागिरीत



13445
A

प्रा. देवधर आहेत. त्यांच्याकडे शिकता आलं तर पाहा." [३८] याचा परिणाम असा झाला लेखक कवितेकडे जोरकस वळले ते भराभर कविता करू लागले. पु. ल. च पत्र आले त्यात त्यांनी सर्वाना कविता आवडल्याच कळवलं. कवितेमुळेच त्यांना मान मिळत गेला. या यशाचे सर्व श्रेय ते भावेसरांना देतात. वि. स. खांडेकर यांनीही वर्तमानपत्रातून येणा-या कुसुमाग्रजांच्या कविता एकत्र करून 'विशाखा' नावाचा काव्यसंग्रह प्रसिध्द केला आणि कुसुमाग्रजांना प्रकाशाचा कोपरा दाखविला.

पु. ल. नी लेखकाला पत्रातून व्यंकटेश माडगूळकरांनी 'श्रुतिका' आकाशवाणी केंद्रावर लिहून पाठविण्यास सांगितली. लेखकाने ऑक्टोबरच्या पहिल्या आठवडयात 'अस्पृशता' या विषयावर एक श्रुतिका माडगूळकरांच्या नावे आकाशवाणी केंद्राला पाठवली. त्या 'गावकरी फड' या कार्यक्रमात सादर होतील असे पत्र आले. तसेच अनेक विषय माडगूळकरांनी दिले. त्याबरोबर एक कॉन्ट्रॅक्ट पाठविले त्यावर सहि करून त्यांनी पाठविले. एका श्रुतिकाला वीस रूपये लेखकाला मिळणार होते. ज्या गोष्टी त्यानी कधी स्वप्नातही अपेक्षिल्या नव्हत्या त्या चालून येऊ लागल्या होत्या.

आक्टोबर महिन्याच्या सुट्टीत सर्व मुल घरी गेली पण लेखक गेले नाहीत. कारण रत्नागिरीत त्याला छोटे मोठे काम करून फी व पुस्तकासाठी पैसे गोळा करायचे होते. 'गबाळ' मधील मोरे यांनीसुध्दा सुट्टीत भीक मागितली, गटार उपसली, बोअरिंग मशीनवर काम केले. जाग्रणे करून नाटकांतून कामे केली. पण शिक्षण मात्र सोडले नाही. ग्रामीण भागातील अशा अनेक तरूणांना शिकण्यासाठी सुट्टीतील मजा लुटता आली नाही. उलट सतत कष्ट, अपमान, अवहेलना सहन करावी लागली. सुट्टीत लेखक रत्नागिरीत राहिल्यामुळे भूदान-पदयात्रेला जाऊन निष्ठापूर्वक प्रचारकार्य करतो. पण या चळवळीतील लोकांच्यात प्रामाणिकपणा नव्हता. शेतमजूर होऊन शेतक-यांच्या प्रश्नासाठी लढणे व मातब्बर शेतकरी होऊन लढा देणे यात खूप फरक आहे. शेतमजूराला स्वत:च्या अडचणी माहित असतात. हाच फरक लेखकाला समजत गेला व तो अधिक वास्तववादी होत गेला आणि यामुळेच चळवळीती गैरप्रकार आणि कर्मकांड यामुळे त्याचे मन विटते आणि त्याला वाटते सुट्टीत प्रचारकार्य करण्यापेक्षा गावाकडे जाउन शेतात राबलो असत तर बरं झाल असत. गावाकडून पत्र येत तरीही पैसे मिळविण्याच्या उद्देशाने तो घरी जात नाही.

कर्मवीर भाऊराव पाटील यांनी जैन छात्रालयात असताना बंडखोरी केली पण ती चांगल्यासाठी मात्र लेखक ज्या सर्वादय छात्रालयात होते तेथे मात्र भूदान कार्यकर्त्यांची मुले खुप खोडया, दंगा करत वस्तीगृहाचे अनेक नियम मोडत. स्वत: गुरूजीही नियमाचे पालन करत नसत त्यामुळे मुले मन मानेल तशी वागत होती.

रत्नागिरीहून कागलला आल्यावर पुढील शिक्षणाची काळजी त्यांना वाटू लागली . पण पु. ल. देशपांडे यांच्या सांगण्यावयन जे. पी. नाईक यांनी लेखकाची कोल्हापूरला 'प्रिन्स शिवाजी बोर्डिंग' मध्ये राहण्याची सोय केली.

लेखकाचे गोखले कॉलेजमध्ये नाव दाखल झाले. रत्नागिरीपेक्षा कोल्हापूरात त्यांना अभ्यासाला भरपूर वेळ मिळू लागला. त्यामुळे त्यांचे वाचनही मोठया प्रमाणात वाढले. रेडिओवर श्रुतिका होत होत्या. त्यामुळे बोर्डिंगमधील मुल इतर मुलांप्रमाणे त्यांना त्रास देत नव्हते. त्यामुळे त्यांच्या वाचनात अडथळा येत नव्हता.

सप्टेंबर महिन्यात त्यांना 'पुणे आकाशवाणी' केंद्रावर कविता वाचनासाठी बोलविले कवितेचे रेकॉर्डिंग करताना त्यांना खूप त्रास झाला पण शेवटी पुरूषोत्तम जोशी, बोरकर यांनी अतिशय व्यवस्थितरित्या रेकॉर्डिंग करून कविता घेतल्या. आक्टोबरमध्ये रात्री साडेसात आठच्या दरम्यान रेडिओवर कार्यक्रम होता. एका मागोमाग एक कार्यक्रम झाले आणि 'काव्यकुंजा'ची वेळ झाली नि सगळयांची उत्कंठा शिगेला पोचली. कवी आनंद यादव म्हणून माझ नाव उच्चरलं गेल. भाबड तोंड आ ऽ वासून, मोठं मोठे डोळे करून एकमेंकांकड बघू लागली. [३९] आपल्या मोठया भावाचे नाव रेडिओत आले म्हणून सर्व भावंडे, आई, वडील मन लावून कविता ऐकत होते. लेखक म्हणतात "भावंड ऐकता ऐकता पुढ सरकत होती. हरणाच्या पाडसागत रेडिओच्या दिशेन मान आणि कान टवकारत होती. तोंड पिकलेल्या आंब्यागत झालेली. आई हर्षवायू झाल्यागत तोंडाला पदर लावून हसायला लागली." [४०] आईला रेडिओवर आपल्या मुलाचा आवाज एकून आश्चर्य वाटले. ती म्हणाली " ..... बया! बया! बया! आन्दा, तुझ्याच आवाज की रं हयो तू सोप्यात बसून पुस्तक वाचत असल्यागत वाटतोयस की - काय गं ऽ ऽ बाई आचीट हे! " [४१] ती तिरक्या नजरेन आपल्या मुलाकड पहात होती ते पाहून डॉ. काळे स्वत:च मनोरंजन करून घेत होते. स्वत:शीच हसत होते.

ऑक्टोबरमध्ये लेखक कागलला गेले तेव्हा निवडणुकांच वार वाहू लागल होत. आचार्य अत्रे यांचा 'साप्ताहिक','नवयुग' आणि दैनिक 'मराठा' अतोनात लोकप्रिय झाले होते. लेखक विष्णोबाच्या खोलीत जाऊन दररोज नेमाने वाचन करत. त्यामुळे राजकारणातील बारकावे प्रामाणीकपणा तेथे किती महत्व आहे याची समज आली.

इंटर परीक्षेचा फॉर्म भरण्यासाठी पु. ल. देशपांडे, जे. पी. नाईक यांनी मदत केली. जे. पी. नाईकांनी पुढील वर्षी गारगोटीला 'मौनी विद्यापीठा'चे काम पहायला सर्वजण जाणार असल्याचे सांगितले. यामुळे लेखकाला आधार तुटल्यागत झाले. त्याच मन अतिशय उदास झाले. यातूनच अनेक कवितांची निर्मिती झाली. त्यांनी सुनितातांईना लिहिल, " ..... मी तीनतीनदा शिक्षणासाठी धडपडतो आहे. पण वर्षभरापुरता स्थिर झालेला पाया खाली ज्वालामुखी असल्याप्रमाणे वर्षाअखेर उद्‌धस्त होतो आहे. पुन्हा नविन

तयारी, नविन मांडणी करावी लागते. सारखी किती हातघाईची लढाई करायची? " [४२]
यातून त्यांच्या मनाची अवस्था स्पष्ट होते.

इंटरचा रिझल्ट लागून यादव सेकंड क्लासमध्ये पास झाले. मराठीत ते कोल्हापूर सेंटरला पहिले आले होते. यामुळे त्याचे कौतुक झाले. जग जोशी हा त्यांचा मित्र एकदा कागलला त्यांच्या घरी आला त्यावेळी घरातील दारिद्रय लपविण्याचा लेखकाचा प्रयत्न केविलवाणा होता.

सोळा जूनला महाविद्यालय सुरू झाले. तेव्हा सुनितातार्इ, जे. पी. नार्इक यांनी पत्र पाठवून मदतीचा आधार दिला. विषय कोणता घ्यावा या गोंधळातूनच 'मराठी' हा विषय घेतला. डॉ. भिंगारे, य. द. भावे, प्रा. रा. वा. चिटणीस, ग. वि. कुलकर्णी या सर्वांचे मार्गदर्शन मिळत होते. यामुळे त्यांची वाटचाल यशस्वी होत होती.

जुनी पुस्तके विकून पंधरा रूपये आले. जे. पी. नार्इक यांनी दोन शिफारस पत्रे आली. यामुळे कॉलेजला अॅडमिशन मिळाले तसेच फ्रि स्टुडंटशिप मिळाली. सुनितातार्इची पस्तीस रूपयाची मनिऑर्डर आली. यामुळे त्यांचा वर्षभराचा खर्चाचा प्रश्न मिटला होता. ग.वि. कुलकर्णी यांच्या मुलांची शिकवणी सुरू केली. त्याचे महिन्याला पाच रूपये मिळत होते. बाल वाचनालयाचे त्यांना महिना दहा रूपये मिळत होते असे त्यांना महिना पंधरा रूपये प्राप्ती होत असे.

परीक्षा संपली तरी घरी न जाता प्रा. कुलकर्णी यांच्याकडे पेपर तपासण्यास आले. त्यांच्या मार्कांच्या बेरजा करणे, पेपर्स पार्सल तयार करून पोस्टान पाठवण इत्यादी कामे केली. पु. ल. देशपांडे यांच्या दिवाळी अंकातील लेखनाचे वाचन मन:पूर्वक करत होतो. मर्ढेकरांच्या कविता, वैचारिक लेखन, गंगाधर गाडगीळांच्या कथा हे वाचण्याचा सपाटा त्यांनी सुरू केला. मुंबर्इला गेल्यावर नाथ पै शी ओळख झाली. त्यांच्याशी चर्चा केल्यावर खेडयातील माणसांचे जीवन शहरात कसे असते ते त्यांना मुंबर्इतील झोपडपट्टीत दिसून आले. कोल्हापूरवर संयुक्त महाराष्ट्राचा चांगलाच परिणाम झालेला होता. याचा परिणाम म्हणून विनाबा भावे यांचे भाषण लोकांनी बंद पाडले होते. घरी गेल्यावर धोंडूबार्इच्या लग्नाची चर्चा सुरू झाली होती. आर्इने त्यांना स्वाद स्थळ बघण्यास सांगितले.

कॉलेजमध्ये असतानाच 'मराठी' च्या प्राध्यापिका अनुराधा पोतदार यांच्याशी ओळख झाल्यावर त्यांना ते प्रेमकविता वाचून दाखवू लागले. यामुळे आपल्या भावना कोणतरी समजून घेत आहे याचा मनस्वी आनंद त्यांना होत होता.

धोंडूबार्इच लग्न झाल्यावर एप्रिलमध्ये त्यांची परीक्षा झाली. पेपर चांगले गेले होते. त्याना एम. ए. चे वेध लागले होते. बी. ए. मध्ये उच्च व्दितीय श्रेणी मिळाली होती. पण घरी याचे कौतुक झाले नाही.

१९५९ च्या जानेवारी फेब्रुवारी महिन्यात करवीर 'साहित्य-सभेत' लेखक माडगूळकरांच्या कथा साहित्यावर बोलले. तेथेच र. ह. पिटके यांच्याशी ओळख झाली. वि. स. खांडेकरांची ओळख करून घेतली. त्यांनी ऑगस्ट महिन्यात घरी बोलबिले तिथे यशवंत, गिरीश, भाऊ यांच्यासमोर कविता चाचून दाखविल्या सर्व मंडळीनी त्यांचे कौतुक केले. त्यांनी केशवसुत, गडकरी, तांबे यांची कविता अभ्यासण्यास सांगितल्या. व. ह. पिटके यांनी लेखकाच्या कविता वाचल्यावर त्यांनी कविता पारितोषिकासाठी पाठवा म्हणून सांगितले त्याप्रमाणे लेखकांनी चाळीस निवडक कविता एकत्र करून त्याच्या दोन प्रती तयार करून सप्टेंबर मध्ये पोस्टाने पाठवून दिल्या.

डिसेंबर मध्ये शंकर पाटील यांना फेलोशिप मिळाल्यामुळे त्यांची आकाशवाणीवरील जागा रिकामी झाली होती. माडगूळकरांनी लेखकांना अर्जंट पत्र पाठवून बोलावून घेतले. तेथे त्यांना स्क्रिप्ट रायटरची जागा दिली. रेडिओवर नोकरी लागल्याच गावात सर्वांना सांगितल. गावाला गेल्यावर त्याना "गांधीच्या वळणावर विठोबा दिवाणजी लगालगा कुठतरी जाताना दिसल. सकाळी त्यांची गाठ घेण्याचा प्रयत्न केला होता. पण घरात, ऑफिसात, गिरणीत कुठंच दिसले नव्हते. म्हणून ते दिसल्याबरोबर त्यांना हाक मारली. नमस्कार केला. रेडिओ नोकरी लागल्याच व उद्याच पुण्याला जात असल्याच त्यांना सांगितल शिक्षण सोडणार नसल्याचही सांगितल त्यांना खूप आनंद झाला ते म्हणाले "झोकास केलस पोरा आईबा ऽ च नांव काढशीलच पर गावाचबी नाव काढ. शिक्षण सोडू नकोस चांगला पी एच डी हो त्या खुळया रतनचे ऐकल न्हाईस, ते बरं केलंस आणि नुसती विद्या शिकू नको. तिची जोपासना करायला शीक".[४३] ज्या विठाबाने त्यांना शिक्षणासाठी मदत केली होती. त्यांना लेखकाच्या विषयी आदर वाटत होता. अभिमान, विश्वास वाटत होता. डॉ. भिंगारेच्यामुळे लेखकांना कॉलेजची काळजी वाटत नव्हती. त्यामुळे ते बिनदास्त पुण्याला रेडिओवर नोकरीला गेले. थोडा प्रा. खानविलकर यांचाा विरोध झाला पण डॉ. भिंगारे यांच्यामुळे ते व्यवस्थित झाले होते.

आकाशवाणी केंद्रावर नोकरीत रूजू झाल्यावर तेथे पहिल्याच दिवशी त्यांची तारांबळ उडाली तेथील मोठमोठया लोकांचे वागणे त्यांच्या लक्षात आले तयात सुनितातार्ईच्या पत्रानं त्यांना खूप आधार आला. आकाशवाणी केंद्रातील स्टाफ विचित्र वागणे त्यांना पटत नव्हते. शंकर पाटलांशी त्यांची ओळख झाल्यावर त्यांच्या स्वभावातील चांगुलपणा त्यांना जाणवत होता.

पुण्यात लेखकाच्या राहण्याचा मोठा प्रश्न उभा राहिला होता. थोडे दिवस ते सुधाकर या मित्राकडे राहिले. पुण्यात आल्यामुळे द. मा. मिरासदार, सरोजताई, मधुसुदन अशा मोठमोठया साहित्यिकांशी त्यांची ओळख झाली होती. त्यांच्या बरोबर ते साहित्यिक गप्पा मारत होते.

दै. सकाळ मधून 'हिरवे जग' या कविता संग्रहाला साहित्य अकादमीच पारितोषिक मिळाल्याची बातमी आली आणि लेखक भारावून गेले. बापूसाहेब, कुंभोजकर, कमलाकर दिक्षित यांनी पुस्तक प्रकाशनाला व लेखकाचा सत्कार घेण्याला खूप मदत केली. ज्यांनी लेखकाच्या कवितेला प्रेरणा दिली ते न. वा. सौदलकर गुरूजी, व. ह. पिटके या सत्कार समारंभाला हजर होते.

जूनपासून नोकरीची वेळ दुपारी बारा ते आठ केल्यामुळे त्यांना अभ्यासाला वेळ मिळू लागला. वसतिगृहात त्यांना प्रवेश मिळाला. कॉलेजमध्ये डॉ. तळपुळे, डॉ. सहस्त्रबुध्दे, डॉ. पाठक, डॉ. पटवर्धन, प्रा. क्षीरसागर ही मंडळी मराठी शिकवित प्रा. मंगळूरकर, प्रा. गद्रे हे संस्कृत शिकवित त्यांच्या शिकविण्याचा लेखकाच्या मनावर संस्कार झालाच असे नाही. रविंद्र सुर्वे, द. ता. भोसले, जगन्नाथ जोशी अशा अनेक मित्रांची सुख-दुःखे समजावून घेत व त्यांना योग्य सल्ला ते देत होते.

शंकर पाटलांचा परिचय वाढल्यावर त्यांच्या कथांचे अनेक पैलू लेखकांच्या लक्षात आले. "आकाशवाणीवर मोठमोठे गायक, साहित्यिक, समीक्षक, तमासगीर, नाटकातले क्वचित सिनेमातले कलाकार, वैचारिक-सांस्कृतिक क्षेत्रातील विचारवंत, विद्वान माणसे येत. त्यांचा कार्यक्रम असे किंवा त्यांच्या कार्यक्रमाचे रेकॉर्डिंग होई. ते होण्यापूर्वी किंवा झाल्यानंतर सहजासहजी बोलणी, गप्पा, विनोद घडत. या सर्वांना अगदी जवळून, अनौपचारीक स्वरूपात पाहायला नि ऐकायलाही मिळे. ही तृप्ती काही वेगळी होती. सांस्कृतिक क्षेत्रातला पुण्याचा मोठेपणा नि महत्व त्यामुळे कळे." [४४]

आकाशवाणी केंद्रावरच त्यांची इंदिरा गांधीशी भेट झाली. या अनपेक्षितपणे घडलेल्या या प्रसंगाने ते सुखावून गेले. श्री. बा. रानडे, वि. द. घाटे, श्री. पु. भागवत, मंगेश पाडगावकर, माधव आचवल यांनी त्यांच्या 'हिरवे जग' मधील कवितेचे खूप कौतुक केले. भागवतांनी तर शेटे प्रकाशनातर्फे त्यांचे पुस्तक प्रकाशित केल.

पगाराच्या कारणावरून तसेच नोकरीत होणारा मानसिक त्रास कामापेक्षा कमी पगारामुळे लेखकांनी आकाशवाणीवरील नोकरी सोडून दिली. पु. ल. व सुनिताईना हे समजल्यावर त्यांनी आता भरपूर अभ्यास करून फर्स्ट क्लास मिळव आमचे आर्शिवाद आहेत. अशा आशयाचे पत्र आले. एम. ए. खूप अभ्यास करून पेपर देऊन ते घरी आले. गावात त्यांना लहानपणाचे मित्र भेटले. प्रत्येकजण वेगवेगळया व्यवसायात गुंतला होता. त्यांच्यापेक्षा आपण नशिबवान आहोत असं त्यांना वाटत होत.

एम. ए. ला दुस-या श्रेणीत पास झाल्यावर रयत शिक्षण संस्थेत बॅ. पी. जी. पाटील यांनी त्यांची मुलाखत घेतली व त्यांना पंढरपूर येथे प्राध्यापकाची नोकरी मिळाली.

थोडक्यात "नांगरणीतील नायकाचा प्रवास आत्मशोधाचा, आत्मपरिक्षणाचा आहे. सर्जनाची ओढ आहे. यातील नायक त्याच्याकडे व्यक्तिमत्व विकासाचे माध्यम म्हणून पाहतो." [४५]

'नांगरणी'तील लेखकाचा प्रवास हा एस. एस. सी. ते एम. ए. पर्यंत शिक्षणासाठी केलेली केविलवाणी धडपड व त्यात यशस्वी झाल्यावर त्यांना मिळणारे समाधान, नोकरी लागल्यावर आई-वडिलांचा त्याच्याकडे पाहण्याचा दृष्टिकोन, आत्तापर्यंत शिक्षणासाठी घेतलेले श्रम व झालेले हाल याचे गोड फळ नोकरीच्या रूपाने त्यांना मिळाले.

लेखकासारखी जर कर्तृत्वान मुले असतील तर त्यांना मदत करणारी माणसे भेटत जातात. यातूनच अशा मुलांना प्रेरणा मिळून ती शिक्षण पूर्ण करतात. हेच लेखकाच्या कर्तृत्वाने सिध्द झालेले पाहावयास मिळते.

## घरभिंती

जून १९६१ मध्ये ते पंढरपूर येथे रयत शिक्षण संस्थेच्या महाविद्यालयात रूजु झाले. प्रा. कुरूंदवाड यांच्याकडे राहिले. लेखक म्हणतात."शिक्षणासाठी आजवर घेतलेले कष्ट, प्राध्यापकाची नोकरी मिळविण्यासाटी झालेली पूर्तता आणि मानसिक विसाव्याची वाटणारी गरज यामुळ मी काही काळ काहीसा सैलावून गेले. या काळात पंढरपूर शहराच्या आसपासच्या भागात विद्यार्थ्यांबरोबर भटकलो. ट्रीप बरोबर वेरूळ-अजंठा, देवगिरीचा किल्ला इ. बघून आलो." [४६] तरीही त्यांचे वाचन मात्र चालू होते. विशेषत: व्यंकटेश माडगूळकर, शंकर पाटील, रणिजित देसाई, द. मा. मिरासदारा यांच्या ग्रामीण कथा ते वाचत होते. त्यांचा विशेष जोर ग्रामीण कथांकारांवर होता. ग्रामीण कथांत येणारे सुखदु:ख त्यांना वरवरचे वाटत होते. ते म्हणतात,"आपण कथा लिहून ग्रामीण माणसांना बोलकं कराव, त्यांच्या सुखदु:खात खोल उतरावं, त्यांनाच प्रत्यक्ष वाचकांसमोर ढकलाव नि आपण पार माग राहावं, अस काहीबाही मनात पुष्कळच येऊ लागलं" [४७] एस. एस. भोसले म्हणाले," तू महाआळशी आणि खुशालचेंडू झाला आहेत. एवढ शिकून प्राध्यापक झालास, आता असंच आयुष्य घालवणार का?, " [४८] त्यांच्या या बोलण्याने यादव लेखनाकडे गांभीर्याने वळले. 'सत्यकथा', 'मौज' चे वाचन करून त्यावर ते चिंतन करत. काही कथा, कविता त्यांच्यापासून प्रसिध्द झाल्या. त्यामुळे त्यांचा आत्मविश्वास या मासिकातून बळावला होता.

सुट्टीत घरी गेल्यावर त्यानी घराची व्यवस्थित बांधणी केली. आईने लग्नाचा विषय काढला. आक्कातांईशी लग्न करावे अशी तिची इच्छा होती पण ते गप्पच राहिले. रानडे व अनुराधा पोतदार यांनी लग्नाबाबत आपले विचार यादवांना सांगितले.

वसंत पाटीलकडे गेल्यावर तो म्हणाला, "माझ्या मामाच्या दोन मुली आहेत त्यातील एक पसंत कर" [४९] असा सल्ला दिला. आनंदाला स्वत:च्या मुलीला दयायचे असे ठरवले. म्हणून त्याने तिला एस. एस.सी पर्यंत शिकविली होती. पण लेखन तिला बहिणीसमान मानत होता. पूर्ण विचार करून लेखकांनी वसंत पाटीलच्या डॉक्टर मामाच्या मुलीशी लग्न करण्याचा निर्णय घेतला. साखरपुडा कागलामध्येच घेतला. लग्नाची तारीख डिसेंबरमध्ये घेतली. मामाने त्यादिवशी दारू पिऊन घरात खूप गोंधळ घातला. लग्नाच्या दिवशी मामा काहीतरी करणार या भीतीने ते खूप घाबरले होते. पण मामा लग्नाला आला आणि म्हणाला. "आन्दा, शेवटाला मी तुझा मामा हाय. अक्षताला येणार न्हाई. असं कसं हुईल ? .... सुखानं संसार करा " [५०] त्यानं आर्शीवाद दिला. भाच्याच्या प्रेमापोटी मामाने माघार घेतली होती.

१५ जूनला कॉलेजवर हजर रहायचे होते. स्मिताला पुढे शिकवावे असे वाटत होते. तिची एस. एस. सी झाली होती. बी.ए. करावी अशी त्यांची इच्छा होती. तिने पदवीधर होऊन नोकरी करावी अस वाटत होत. म्हणून ते तिला आईचा विरोध होता तरी पंढरपूरला शिकण्यासाठी घेऊन गेले.

पंढरपूरला दोघांचा संसार चालू झाला. दिवाळीत ते परत घरी आल्यावर त्यांच्या वडिलांचा पूर्वीचा आळशीपणा चिलीम ओढण्याचे व्यसन वाढत चालल्याचे त्यांच्या लक्षात आले. पण ते काही करू शकत नव्हते. आई तर स्मिताला पंढरपूरला नेले म्हणून त्यांच्याबरोबर बोलत नव्हती. सर्व भावंडाना आणलेल्या कपडयांना तिने हात लावून दिला नाही. मामाने समजावले तरी तिने त्याचे ऐकले नाही. पंढरपूरला गेल्यावर तेथे स्वत:ला ते वाचनात गुंतवून घेऊ लागले. 'सत्यकथे' ला नव्या वळणाच्या ग्रामीण कथा पाठवू लागले. संपादक श्री. पु. भागवत आले' व्हनाजवळ बॅग ठेवली. सहज व्हनावरच्या दिवळीत नजर गेली ; तर मी दिवाळीत भावंडाना घेतलेल्या कपडयांचा गाठोड तसंच धूळ खत पाचसहा महिने पडलेले "[५१] लेखकाला आईचा राग आला. पाचसहा दिवस ते कोल्हापूर, पुणे, कुलाब्याला जाऊन आले याच काळात आईचा राग शांत झाला अन् दिवाळी साजरी झाली.

'मे' महिन्यात श्री. पु. भागवत, व. ह. पिटके, प्रल्हाद वडेरे, श्रीनिवास कुलकर्णी ही साहित्यिक मंडळी कागलला आली. जेवण खूपच तिखट झाले होते. त्यामुळे ते सर्वांच्याच लक्षात राहिले. यादवांच्या मनाला रूखरूख लागली. पिटके म्हणाले. "तस मनाला लावून घेण्याच काही कारण नाही."[५२] यामुळे त्यांना बर वाटल. जूनमध्ये डॉ.

सरोजिनी बाबर यांचे पत्र आले "शाहू कॉलेजात येऊ शकाल" अशी विचारण केली. पण रयत शिक्षण संस्थेने असिस्टंट प्रोफेसराची दोन वर्षात बढती देऊन कराड येथे नेमणूक केल्याच पत्र पाठवल. काय करावे त्यांना सुचत नव्हते. अनंकांचे सल्ले घेतले ते म्हणाले "थंड डोक्यानं आठ दिवस विचार केला. तरीही माझ पुण्याचं आकर्षण कमी होईना ... वाटू लागल हे सगळ खरं असलं तरी माझ्या वाङ:मयीन व्यक्तिमत्वाचा विकास ख-या अर्थान पुण्यात जसा होऊ शकेल तसा ग्रामीण विभागात होऊ शकणार नाही. पुण्याच्या सांस्कृतिक वातावरणात माझ्या साहित्यीक महत्वाकांक्षेची पूर्तता सर्वार्थान होऊ शकेल. पुण्याच्या वातावरणाला बाहेर कुठही तोड नाही, याचा मला अनुभव आला होता. मी सर्व प्रकारचे तोटे पत्करून पुण्यात येण्याचा निर्णय घेतला. " [५३]

पुण्याच्या श्री शाहुमंदीर महाविद्यालयात १९६३ मध्ये दाखल झाल्यावर जागेचा प्रश्न निर्माण झाला. कागलला सुंदराला तिच्या सासरी खूप छळ झाला, त्यात लेखकांनी ती नांदायला जात नाही म्हणून थोबाडीत दिली तेव्हा तिच्या कानावर जोरात बसली. कानातील काटे मानेत घुसले व रक्ताची चिळकांडी लागली. रक्तस्त्राव थांबला. काही दिवसातच सुंदराबाईनं जाचाला कंटाळून वेनगंगा नदीच्या भर पुरात उडी मारून आत्महात्या केली.

मळयाच्या मालकाने यादवांच्या विरूध्द कोर्टात दावे लावले. सरकारी कायद्यानुसार मालकाला निम्म्यापेक्षा कमी फाळा ठरवून मिळाला त्याला तो फाळा नगण्य वाटला. तो वरच्या कोर्टात जात राहिला. लेखकाच्या वडिलांची त्याच्यामागे फरफर् चालली. मालकाच्या अनेक वकिलाशी मैत्री होती. लेखकाचे वडील कोर्टाच्या 'फी' ला वैतागले होते. त्यांना काळजीने अल्सर झाला होतो. पण शेवटी कोर्टाचा निकाल मालकाच्या बाजूने लागला आणि नवीन संकट घरावर कोसळले होते.

पुण्याला राहिला गेल्यामुळे त्यांच्यावर आर्थिक ताण खूप आला. पगाराचे पैसे शिल्लक रहात नव्हते. पुण्यात नवीन असल्यामुळे रोखीचा व्यवहार करावा लागे. मळा गेल्यामुळे घरातील सर्वजण हादरून गेली होती. त्यांना धीर देण्याचा ते प्रयत्न करत होते. मामाच्या घरच्या परिस्थितीला त्यांनी थोडाफार हातभार देण्याचा प्रयत्न केला. सुंदराबाई गेल्यामुळे मामाचीही परिस्थिती अतिशय वाईट झाली होती. तरीही जिद्दीने उभा राहून पिठाची गिरण, स्वतः चालवत होता. तर चटणी करण्याचे मिशन त्याची दुसरी बायको रखमाबाई चालवत होती.

पगारावर घरातील खर्च भागत नाही, म्हणून लेखक म्हणतात "पुणे विद्यपीठाच्या परीक्षांचे पेपर्स तपासण्यास काम मिळावे म्हणून अर्ज केला. जेष्ठ प्राध्यापकांना भेटून, पत्रे लिहून परीक्षक म्हणून नेमणूक करा म्हणून विनंत्या केल्या ."[५४] आकाशवाणीवर स्क्रिप्टस लिहिण्याचे काम मिळते का पहिलं याच वेळी त्यांचे 'सत्यकथेतून नव्या वळणाच्या

ग्रामीण कथा भराभर येत होत्या, त्यामुळे संपादक व प्रकाशकाच लक्ष त्यांनी वेधले होत. 'सवदिपा' च्या पूर्णवेळ कार्यकर्त्या माई किर्लोस्कर यांची पुण्यात असताना गाठ घेऊन त्यांच्याशी समाजकार्यासंबंधी चर्चा झाली.

'बुवा' चे संपादक ग. वा. बहेरे यांच्याशी चर्चा करून 'प्लॅस्टिकची संस्कृती' हे लेखनाला लिहीण्याचे त्यांनी निश्चित केले. घरी वारंवार पेसे पाठवावे लागत होते. आक्काताईचे डी.एड्. पूर्ण होऊन तिचे हायस्कूलच्या अध्यापकाशी लग्न झाले. तिलाही तेथेच नोकरी मिळाली. मला गेल्यामुळे घरातही सर्वजण बाहेर कामाला जात. वडिल, आई घरातच बसून असत. दादाला चार गोष्टी समजावून सांगितल्या. तो मळा परत मिळेल याची स्वप्ने पहात होता.

पुण्यात पेपर्स तपासण्यास त्यांनी सुरूवात केली. घरी तीनशे रूपगे विधवा कुंभारणीचा फाळयान शेत करण्यासाठी मला विकत घेण्यास पैसे पाठविले. सर्व परिस्थिती समजावून सांगितली. याच कालावधीत भारताचे पंतप्रधान पंडित नेहरू यांचे निधन झाले. यामुळे लेखक अस्वस्थ झाले. स्मिताची भावंडे घरात आल्यामुळे आर्थिक ताण कमी झाला. तिची पळापळ कमी झाली. जून ते नोव्हेंबर काळात भरपूर लेखन झाल यामागे आर्थिक गरजेची प्रेरणाही कार्य करतच होती. ऑक्टोंबरमध्ये 'चालू जमाना' हे ग्रामीण विभागातील सदय: स्थितीवर आधारित सदर श्रुतिकारूपात सुरू झाले. त्याचे महिन्याकाठी चाळीस रूपये सुटू लागले. दिवाळी अंकासाठीही भरपूर लेखन त्यांनी केले. दिवाळीच्या काळात 'मातीखालची माती' या व्यक्तिचित्रांच्या संग्रहांच हस्तलिखीत तयार केल. कुंभारणीचा मुलगा शिवरूद्रने जमीन पाच हजार रूपयाला देण्याचे कबुल केल. डिसेंबरमध्ये स्मिताला मुलगी झाल्याच कळालं. तिचं नाव स्वाती ठेवल. धोडूबाईला तिचा नवरा संभाळत नव्हता. त्यामुळे ती घरीच रहात होती.

मे महिन्यात पाच हजार रूपये जमविण्याच्या खटपटीत होतो. मामा पाचशे रूपये दे म्हणून मागे लागला होता. पण आर्थिक अडचणीमुळे, वाढत्या खर्चामुळे ते देऊ शकले नाहीत. यात हिराबाईच्या आजारीपणामुळे तर खर्च खूपच वाढला होता.

त्यांची १९६४ च्या 'सत्यकथेच्या' दिवाळी अंकात मोर ही कथा आली. त्यावर के. नारायण काळे यांनी टिपण लिहीले. ते चर्चेसाठी खुल ठेवल. या कार्यक्रमाला वि.द. घाटे, वाडेकर, प्रा. मंगरूळकर, पु .ल. देशपांडे असे मान्यवर उपस्थित होते. प्रा. गंगाधर जोगळेकरांनी कार्यक्रमात ही कथा वाचण्यास यादवांना सागितली त्यांनी व्यवस्थित वाचल्यावर प्रा. मंगरूळकर त्वरेने उडून म्हणाले," माझा आक्षेप मी पूर्ण पणे मागे घेतो. या कथेची ग्रामीण भाषा अतिशय स्वाभाविक आहे. याचा साक्षात प्रत्यय मला आला. " [५५] तेथेच कथावाचन कसे असावे यासंबंधी त्यांनी लेखकाला सांगितले. पुण्यातल्या अनेक प्रतिष्ठीत लेखकांचा परिचय तसेच सत्यकथेच्या ग्रुपमधील शंकर पाटील, वि.शं. पारगावकर, विद्याधर पुंडलीक, प्रा. अ.वा. कुलकर्णी, प्रा स.शि. भावे, यांच्याशी केलेल्या

वाङ:मयीन चर्चा त्यांना अधिक जाणकारी आणत होत्या. ना. धो. महानोर, रा. रं. बोराडे या सर्वांच्यामुळे त्यांना लेखनाविषयी अधिकच उत्साह वाढत होता.

फ्रेबुवारी १९६६ मध्ये धोंडूबाईच दुसर लग्न झाल तर हिराबाईचा संसार उध्वस्त झाला होता. शिवाय लग्न झाल्यामुळे घरखर्च खूपच वाढला. भरपूर खर्च करून कागलात दिवाळी साजरी झाली. "लेखक म्हणतात, "कीर्तीचा जन्म झाला त्याच्या पुढच्याच महिन्यात 'मातीखालची माती' या त्यांच्या व्यक्तिचित्र संग्रहाला महाराष्ट्र सरकारचं खास पारितोषिक मिळाल. स्मिताला तो मुलींचा पायगुण वाटला. " [५६]

या काळात त्यांची कथा बहाराला आली. जाणवेल तो अनुभव ते कथारूप करू लागले. कथालेखनाचा त्यांचा झपाटा वाढला. 'सत्यकथेचे' भागवत, पटवर्धन यांनी त्यांच्या कथा भराभर प्रसिध्द केल्या. यातूनच 'खळाळ' हा पहिला कथासंग्रह आकाराला आला. लक्ष्मीला पुण्याला ठेवल्यापासून आईच लक्ष घरी लागत नव्हते. ती पुण्याला सारखी पत्र पाठवत होती. तिला लक्ष्मीची भीती वाटत होती. लेखक म्हणतात, "लक्ष्मीवर तिचा जीव होता. ती तिच्या हातातली काम चटाचट घेत होती. स्वैपाकात भराभर मदत करत होती. हौदाला जाऊन भराभर पाण्याच्या खेपा आणत होती. ती घरात असली की आई निर्धास्त असे. म्हणून खेपा आणत होती. ती तिला 'जवळ' हवी होती ... " [५७] आईच्या अनेक पत्रामुळे तसेच तिला पाहुणे बघायला येणार म्हणून त्यांनी अनेक अडचणी असताना लक्ष्मीला घरी पाठवून दिले. आप्पा एस.एस.सी ला दोनदा नापास झाला होता. स्मिताला कर्मवीर भाऊसाहेब हिरे हायस्कूलमध्ये नोकरी मिळाली होती. वडिलांना पुण्याला आणल पण त्यांना तेथील हवा न मानवल्यामुळे परत कागलला पाठवून दिले. दौलत हुशार होता त्याची हुशारी बघून शिक्षकांनी त्याला हिंदी आणि ड्रॉईंगच्या परीक्षांना बसविले. घरी पैसे पाठविण्याच बंद केल्यामुळे आईन त्याच्याविरूध्द गावात कागाळया करण्यास सुरूवात केली. गावातील गुरूजींची पत्रे त्याला आल्यामुळे त्यांचे मन दुखावले लेखक म्हणतात
" आजवर मी देत आलो, करत आलो ते आईन अस कस विसरल या जाणिवेन मला अतोनात दुःख होऊ लागल. घरादारासाठी मी एवढं करतो तरी आई माझ्या मदतीला आपली एखादी धडशी पोरही कशी पाठवून देत नाही. माझ्या धडपडीची तिला कशी पर्वा नाही, माझा संसार तो तिला आपलाच संसार कसा वाटत नाही. माझा संसार तो तिला आपलाच संसार कसा वाटत नाही, या कल्पनेन माझ्या जिवाला साप-विंचू डसल्यासारख होऊ लागले " [५८] आईबरोबर त्यांचे असे अनेकदा खटके उडत होते पण पुन्हा काही दिवसांनी सर्व शांत होते.

वडीलांची - आईची भांडणे वयाची पन्नाशी ओलांडली तरी होत होती. शिवाची बायको मधूनच भांडण काढीत होती. शिवाला कोणाचाही धाक नसल्यामुळे त्याला बाहेरचे नाद लागले होते. त्यामुळे तो आजारी पडला होता. पुण्यावरून पाठविले पैसे, घरातील

अंगठी घेऊन चार दिवस तो बेपत्ता होतो. पतपाणी नीट करत नसल्यामुळे तो परत आजारी पडतो. त्यामुळे काही कामधंदा न करता तयाला घरातच बसाव लागत.

साहित्यक्षेत्रात ओळखी झाल्यामुळे अनेक साहित्यीक, संपादक, प्रकाशक, समीक्षक, कलावंत त्यांच्याकडे येत होते. त्यांचे कार्यक्रम ठरविण्यासाठी बाहेर गावची मंडळी त्यांच्याकडे येत होती. लेखक म्हणतात, "सुनीताताई महत्वकांक्षा वाढीला लागली. पहिल्याच पुस्तकाला पारितोषिक मिळाल, अभिप्राय खूपच अनुकूल आले. 'सत्यकथा' नि 'मौज' यांनी एकदम दिवाळी अंकातून कथा -कवितांना प्रतिष्ठापूर्ण लक्षवेधी प्रसिध्दीही दिली. 'मातीखालची माती' ला उत्तम प्रतिसाद मिळाला नि दुसारा शासकीय पुरस्कार मिळाला .... पुण्या-मुंबईच्या साहित्यक्षेत्रात मान्यता मिळू लागली. माझ्या साहित्याला, साहित्य विचारांना घवघवीत यश येतय हे भारंभार मागणीमुळे नि व्याख्यानासाठी येणा-या निमंत्रणामुळे तीव्रतेन जाणवू लागल. मी भान हरपूर साहित्यनिर्मितीत जास्तीत जास्त रमू लागले." [५९] प्रभाकर पाध्यांनी 'पोएट्री - कल्बची' स्थापना केली. येथे वाड:मयावर भरघोस चर्चा होत असे, यामुळे ते सखोलपणे घडत गेले. त्यांच्यातला साहित्यीक पुष्ट होत चालला होता. शिवाय पुण्याची साहित्यपरिषद, वसंत व्याख्यानमाला, इतर वाड:मयीन कार्यक्रम यांच्या वातारणात ते रमत होते. पाच वर्षानी त्यांना एम.ए. ला शिकविण्याच प्रमाणपत्र मिळाले. गावाकडच्या घरादारासाठी पैसा जमविण्यासाठी त्यांनी बाहेरगावचे व्याख्यानाचे कार्यक्रम, परीक्षांचे पेपर्स तपासण्याचे, दिवाळी अंकासाठी लेखन केले याच काळात त्यानी पी एच डी करण्याचे ठरविले. त्यांना वेळ मिळत नव्हता. तरीही कधी बस स्टॉपवर, कधी ग्रंथालयात वेळ मिळेल तेव्हा ते वाचन करत होते. जानेवारीमध्ये 'शिक्षण प्रेमी बाबुराव जागताप' यांच्या आठवणीच सहसंपादन करण्याच काम त्यांच्याकडे याले. ते म्हणाले, "जानेवारीच्या शेवटच्या तारखेला 'खळाळ' ला महाराष्ट्र सरकारचं पारितोषिक मिळाल्याचं प्रसिध्द झाल, 'खळाळ' बरोबर श्री. दा. पानवलकरांचा संग्रही होता. पण खळाळान दुहेरी विक्रम केला. त्याला प्रथम प्रकाशन कथाविभाग आणि प्रौढ विभाग अशा दोन्ही विभागातील पारितोषिक होती ... मला अत्यानंद झाला." [६०] घरचे सर्व व्याप सांभाळून मुंबईला पारितोषिक स्विकारण्यास सहकुटुंब गेले. पारितोषिकाचे आलेले दोन हजार रूपये बहिण लक्ष्मीच्या लग्नात खर्च झाले.

मालकाने घर सोडण्यास सांगितल्यावर परत जागेचा प्रश्न निर्माण झाला. त्यांनी माकलांना भाड देण्याच्या निमित्तान प्रत्यक्ष जाऊन सांगितल, "मी लौकरात लौकर घर सोडतो. अजून काही संस्थेन स्टाफ क्वार्टर्स बांधलय नाहीत. पण मी आता त्यांच्यासाठी थांबत नाही मी दुसरी जागा मिळाली की हे सोडतोच " [६१] कॉलेजमध्ये संस्थेने स्विकारलेले कडक धोरण यामुळे त्यांना बराच मानसिक त्रास सहन करावा लागला पी एच डी व दिवाळी अंकाचे भरपूर लेखन त्यांनी केले.

वि. स. खांडेकर व्याख्यानांच्या निमित्ताने पुण्यात आले. त्यांच्या व्याख्यानाने ते प्रभावित झाले. डॉ वाळिंबे व डॉ भालचंद्र फडके यांच्यामुळे एम ए चे अध्यापन करण्याची संधी त्यांना मिळाली. 'गोतावळा' कादंबरीचे अंतिम संस्करण मार्चमध्ये पूर्ण करून ते श्री पु. ल. भागवत यांच्याकडे छपाईसाठी सुपूर्द केले. आप्पाच्या व दौलतच्या शिक्षणासाठी सारखे पैसे पाठवून दयावे लागत होते. आप्पाने तर पंधरा दिवस नगरपालिकेत काम करून नोकरी सोडून दिली. त्यामुळे त्यांच्या सर्व वर्षाचा खर्च फुकट गेला होता. कॉलेजमध्ये राजकारणामुळे प्राचार्यांनी यादवांना अवांतर काम करण्याच्या अटीवर नोकरीवर ठेवण्याचे कबूल केले होते. स्मिताला हायस्कूल मध्ये नोकरी पक्की झाली होती. घरमालकाने वारंवार सूचना देऊनही घर न सोडल्याने संतापून, "जर का सहा महिन्याच्या आत तुम्ही घर सोडल नाही, तर संसार रस्त्यावर फेकून देईन. घराला कूलूप घालून टाकीन." [६२] असा दम देवून गेला. परत जागेचा प्रश्न निर्माण झाला, त्यात गावाकडील पाटलाचा मळाही गेला. त्यामुळे सर्व जण उघडयावर पडले. कोल्हापूरला व. ह. पिटके, प्रा. कमलाकर दीक्षित यांच्याशी गप्पा मारल्यामुळे त्यांना प्रेरणा मिळाली.

एकाहत्तरला " गोतावळा' कादंबरी प्रसिध्द झाली, तिला उत्तम प्रतिसाद मिळाला. प्रा.माधव मनोहर यांनी या कादंबरीवर समिक्षा केल्यामुळे यादव भारावून गेले. प्रा.गोगेस्कर यांनी या कादंबरीचा झुंजीत अनुवाद करण्यास परवानगी मागीतली. यादवांनी ती लगेच दिली.याच काळात बाबु पुण्याला पळून आला. त्याची समजूत काढून घरी पाठवून दिला. गोतावळा कादंबरीच्या प्रसिध्दीनंतर यादव यांना विदर्भ, मराठवाडा, पश्चिम महाराष्ट्र, कोकण, मुंबई इत्यादी विविध भागातून आणि प्रदेशातून व्याख्यानांसाठी सतत निमंत्रण आली आणि त्यासाठी निरनिरराळया विषयावर त्यांना बोलावे लागले, त्यामुळे वाचन भरपूर झाले, त्यावर कळतनकळत चिंतन होऊ लागले. कॉलेजमधील प्राचार्य खान यांनी कॉलेजमधल्या मासिकांचे संपादक म्हणून यादवांच्याकडे कामगिरी सोपविली यामुळे कॉलेजच्या मुला-मुलीकडून त्यांनी कथा- कविता मागवल्यावर त्यांच्या लक्षात आले की ही ग्रामीण भागातून येत असली तरी त्यांचे विचार मात्र शहरी प्रकारचे आहेत. दौलत एस. एस. सी. पास झाला. शिवाला सोडपत्र मिळाले यामुळे त्यांनी सुटकेचा श्वास सोडला. दौलतला कोल्हापूरला कॉमर्स साईडला ॲडमिशन घेऊन त्याची राहण्याची सोय तेथेच वसतीगृहात केली. दादा-आईचं पटत नव्हतं, शिवा मोठा झाल्याने लहानपणी वडिलांनी केलेल्या छळाचा तो अंगावर जाऊन अथवा शिव्या देऊन बदला घेत होता. त्यामुळे वडील पुण्याला निघून आले होते. डॉ. भोसले ७००-१००० ची जागा रिकामी झाली होती, म्हणून यादवांनी एक अर्ज केला व त्याला एस. ए. एका वर्षाचा शिकविण्याच्या अनुभवाचे सर्टिफिकेट जोडले आणि मराठी विभाग प्रमुख डॉ. रा. श. वाळिंबे यांच्याकडे अर्ज दिला पण कॉमर्सच्या एका प्राध्यापकाने यादवांचे 'टीचिंग

एक्सपीरिअन्स' खोटे आहे असा दावा करून यादवांच्या विरूध्द सर्वांना खोटनाट सांगू लागले. पण मार्चच्या तिस-या आठवडयात डॉ. रा. शं. वाळिंबे यांनी विद्यापीठाला सविस्तरपत्र लिहून सगळयांची तोंड बंद केली.

'गोतावळा' ला राज्य पुरस्कार १९ मार्च १९७३ ला मिळाला. लगेच चार एप्रिलला वसंतराव नाईक यांच्या हस्ते पारितोषिक वितरणाचा कार्यक्रम मुंबईला झाला.' पाच एप्रिल १९७३ च्या 'महाराष्ट्र टाईम्स' च्या पहिल्या पानावर मुख्यमंत्राच्या हस्ते पारितोषिक स्वीकारताना माझा स्वतंत्र एकमेव फोटो छापलेला बघून 'गोतावळा'न मला दिलेली ही सांस्कृतिक आणि वाङ:मयीन प्रतिष्ठा होती. जनसामान्यांच्या जीवनाची मानसिकता ओळखण्याचा पत्रकारांनीही 'गोतावळा' ची योग्यता ओळखली होती. 'गोतावळा'ला राज्यसरकारच पारितोषिक मिळाल्यावर कागल नगरपालिकेनं त्यांचा सत्कार घेतला या कार्यक्रमात त्यांचे हेडमास्तर एस. आर. चौगुले, तु. बा. नाईक, न. वा. सौंदलगेकर सत्यशोधक विचारवंत नि पत्रकार डॉ. डी. ए. घाटगे गावातील प्रतिष्ठीत शेतकरी रामूनाना चौगुले असे अनेक मान्यवर उपस्थित होते. लग्न झाल्यावर शिवान आईशी भांडून वेगळा संसार थाटला होता. गावातले जुने मित्र मधु, शिर्पा यांची सुख दु:खे ते समजून घेत. त्यांना योग्य सल्ला देत. कागलमध्ये पूर्वीपेक्षा खूप बदल झाला होता. अनेक उद्योगधंदे निघाले होते, त्यामुळे संपूर्ण कागलच बदलून गेले होते.

आनसा काही दिवस शहरात राहिल्यामुळे तेथील संस्कृती पाहून तिला आलेला खेडयातील जागा तिला पसंत नव्हती. "शहराची हवा लागल्यामुळ कदाचित असेल आनसाच्या जाग्याविषयीच्या अपेक्षा वाढल्या होत्या. निदान थोडं तरी शिक्षण असलेला साधी सुधी मास्तराची, कारकुनाची किंवा तशीच एखादी छोटी नोकरी असलेला नवरा मिळावा, असं तिला वाटत होत." [६३] यादवांनी आनसाला पुण्याला बोलावून तिची समजूत काढली एप्रिलमध्ये राधाकृष्णाच्या देवळात तिचं लग्न झालं. त्याचा खर्च यादवांनाच करावा लागला. शिवान व्याजानं घेतलेल सणगराच पैसेही याच धावपळीत त्यांना भागवाव लागलं.

लेखक म्हणतात,"पंचाहत्तरला नवीन घर बांधून झाल." गृहप्रवेश करण्यापूर्वी 'वास्तूशांती' चा धार्मिक विधी करायचा स्मिताचा आग्रह या निमित्तानं स्मिताच्या माहेराची आणि आमच्या घरची माणसं बोलवायची ठरवल त्याप्रमाणे गावाकडून नऊ दहा मंडळी आली. घर प्रत्यक्ष बघुन त्यांना प्रापंचिक तृप्तीचा आनंद झाला." [६४] हे घर धनकवडी भागात असल्यामुळे यादवांची खूपच गैरसोय झाली. त्यांची सतत धावपळ होत होती पण स्मिताधीर देत म्हणाली," एवढा पैसा घरासाठी घातला आहे. तो सर्व पाण्यात

पडल्यासारखा होईल म्हणून इथच नेटान राहिले पाहिजे. धनकवडीत लोक राहतातच ना? आपणही त्यातलेच एक खेडूत आहोत, असं समजून सगळया गैरसोयी पत्करायच्या नि इथंच मुक्काम टाकायचा". [६५] स्मिता कावीळीने आजारी पडल्यामुळे यादवांना खूपच भिती वाटू लागली त्यांनी अनेक गावठी उपाय केले, हळूहळू कावीळ ओसरली तरीही ते भावनिक दृष्टया खूप खचून गेले होते. दौलत बी. कॉम सेकंड क्लास मध्ये पास झाला होता. त्याने एम. कॉम. व्हावं अस यादवांना वाटत होते. नोव्हेंबरमध्ये दौलतने "बँक ऑफ महाराष्ट्र" व 'महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळात' जागा भरायच्या होत्या तेथे अर्ज केला. यादवांनी त्यासाठी खूप प्रयत्न करून त्याच्या सुदैवान त्याची महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळावर उमेदवारीसाठी मार्च ७७ मध्ये निवड झाली. महिना १३०।- रू. तो इचलकरंजीला रूजू झाला." [६६] हिरानं आत्महत्या केली त्यामुळे तर त्यांच मन खूपच खचलं. आप्पाच लग्न झाल्यावर यादवांनी तिला शिकव, नोकरीला लाव म्हणून सांगितलं, पण त्याचा परिणाम, आई त्याच्यावर खूपच संतापली. कारण घरात कामाला कोणच नव्हते. त्यामुळे साहजिकच ती संतापत होती.

१६ जानेवारी ७८ मध्ये यादवांच्या वडिलांचे निधन झाले. आईच्या कुंकवाचा मोठा आधार नाहिसा झाला. अष्टयाहत्तरच्या फेब्रुवारीमध्ये त्यांनी शाहू कॉलेजची नोकरी सोडून पुणे विद्यापीठाच्या मराठी विभागात त्यांची प्रपाठक म्हणून नेमणूक झाली. स्मिताला मुलगा झाला. मुलग्याच्या रूपाने दादानंच परत जन्म घेतला. असे सर्वांना वाटू लागलं. सर्वजण आनंदित होते. आई म्हणाली," ------- आन्दा, तुझा बा ऽ आता, कायमचा तुझ्या घरात आला रं ऽ ऽ लेका." [६७] दौलतच्या लग्नामुळे घर माणसात आल्यासारखं त्यांना वाटत होते. सर्वजणांना मार्गाला लावून आईची काळजी पहाण्यास सज्ज झाले होते.

"घरभिंतीतील चित्रण वैशिष्टयपूर्ण आहे, कारण आत्मचरित्राने केवळ जीवनभाष्य करण्यापेक्षा व्यापक पातळीवर जीवनाचा अन्वयार्थ लावून त्याचे दर्शन घडवावे, अशी या आत्मचरित्रात्मक कादंबरी लेखनाची प्रेरणा असल्याचे दिसून येते. म्हणून या कादंबरीचा नायक आपल्या घराची उभारणी करण्याचा जो वसा घेतो, तो अतिशय महत्वाचा वाटते. घराच्या उभारणीचे अपरिहार्य कार्य तो मनापासून जीव ओतून करतो. परंतु हे घर आतून-बाहेर घडविण्यासाठी तो ज्या भावनेने आई-वडील, बहिण-भाऊ, नातेवाईक यांचा विचार करतो, त्या भावनेने ते मात्र या घर उभारणीच्या कार्याकडे पाहत नाहीत. त्याच्या दृष्टीने तो म्हणजे, संकटकाळी आर्थिक मदत करणारा फकत एक हक्काचा सोर्स असतो. तो मात्र मोठा भाऊ, कर्ता मुलगा, एक सुशिक्षीत माणूस म्हणून आपली जबाबदारी पार पाडण्यासाठी धडपडतो आणि आपल्या दरिद्री, अडाणी, मतलबी माणसांना क्षमा करतो. म्हणून त्याची ही आत्मकहाणी वैशिष्टयपूर्ण आणि प्रतिकात्मक ठरते."[६८]

'घरभिंती' मध्ये आनंद यादवांनी घरासाठी केलेले अतोनात कष्ट, पैशासाठी त्यांना सोसावा लागणारा त्रास, त्यातूनही जिद्दीनी भावंडाचे, बायकोचे शिक्षण पूर्ण केले. त्यांना व्यवस्थित नोकरीला लावले. 'घरभिंती' ला प्रवास हा पंढरपूरला आनंद यादव नोकरीला प्राध्यापक म्हणून लागल्यापासून ते वडिलांच्या मृत्यूपर्यंत आला आहे. 'घरभिंती ही आत्मचरित्रात्मक कादंबरीसुध्दा, आत्मसमर्थनात्मक नसून तो एक गंभीरपणे घेतलेला आत्मशोध आहे.

## संदर्भ ग्रंथ

| अ.नं. | पुस्तकाचे नांव | लेखक | पृष्ठ |
|---|---|---|---|
| १ | झोंबी | आनंद यादव | ३१ |
| २ | झोंबी | आनंद यादव | ३२ |
| ३ | झोंबी | आनंद यादव | ३२ |
| ४ | झोंबी | आनंद यादव | ३४ |
| ५ | झोंबी | आनंद यादव | ३८ |
| ६ | झोंबी | आनंद यादव | ४२ |
| ७ | झोंबी | आनंद यादव | ४३ |
| ८ | झोंबी | आनंद यादव | ४३ |
| ९ | झोंबी | आनंद यादव | ४४ |
| १० | झोंबी | आनंद यादव | ७३ |
| ११ | झोंबी | आनंद यादव | ७४ |
| १२ | झोंबी | आनंद यादव | ८३ |
| १३ | झोंबी | आनंद यादव | ९३ |
| १४ | झोंबी | आनंद यादव | ११९ |
| १५ | झोंबी | आनंद यादव | १४७ |
| १६ | झोंबी | आनंद यादव | १४७ |
| १७ | झोंबी | आनंद यादव | १४८ |
| १८ | झोंबी | आनंद यादव | १५२ |
| १९ | झोंबी | आनंद यादव | १५२ |
| २० | झोंबी | आनंद यादव | १५२ |
| २१ | झोंबी | आनंद यादव | १७० |
| २२ | झोंबी | आनंद यादव | १८१ |
| २३ | झोंबी | आनंद यादव | १८४ |
| २४ | झोंबी | आनंद यादव | १८५ |
| २५ | झोंबी | आनंद यादव | १८५ |
| २६ | झोंबी | आनंद यादव | १९१-९२ |
| २७ | झोंबी | आनंद यादव | १९४ |
| २८ | झोंबी | आनंद यादव | १९४ |
| २९ | झोंबी | आनंद यादव | १९५ |

# संदर्भ ग्रंथ

| अ.नं. | पुस्तकाचे नांव | लेखक | पृष्ठ |
|---|---|---|---|
| ३० | झोंबी | आनंद यादव | १९५ |
| ३१ | झोंबी (प्रस्तावना) | आनंद यादव | १८ |
| ३२ | झोंबी | आनंद यादव | २७६ |
| ३३ | झोंबी | आनंद यादव | ३३३ |
| ३४ | झोंबी (प्रस्तावना) | आनंद यादव | १६ |
| ३५ | झोंबी | आनंद यादव | ३५८ |
| ३६ | झोंबी | आनंद यादव | ३५८ |
| ३७ | नांगरणी | आनंद यादव | ५८ |
| ३८ | नांगरणी | आनंद यादव | ६१ |
| ३९ | नांगरणी | आनंद यादव | १४८ |
| ४० | नांगरणी | आनंद यादव | १४८ |
| ४१ | नांगरणी | आनंद यादव | १४८ |
| ४२ | नांगरणी | आनंद यादव | १६१ |
| ४३ | नांगरणी | आनंद यादव | २५९ |
| ४४ | नांगरणी | आनंद यादव | ३११ |
| ४५ | आनंद यादव : साहित्य आणि जीवन | डॉ. एस. एम. कानडजे | १०२ |
| ४६ | घरभिंती | आनंद यादव | ०८ |
| ४७ | घरभिंती | आनंद यादव | ०९ |
| ४८ | घरभिंती | आनंद यादव | १० |
| ४९ | घरभिंती | आनंद यादव | २४ |
| ५० | घरभिंती | आनंद यादव | ३० |
| ५१ | घरभिंती | आनंद यादव | ५३ |
| ५२ | घरभिंती | आनंद यादव | ५८ |
| ५३ | घरभिंती | आनंद यादव | ६२ |
| ५४ | घरभिंती | आनंद यादव | १०६ |
| ५५ | घरभिंती | आनंद यादव | १६४ |
| ५६ | घरभिंती | आनंद यादव | १९२ |
| ५७ | घरभिंती | आनंद यादव | १९९ |

# संदर्भ ग्रंथ

| अ.नं. | पुस्तकाचे नांव | लेखक | पृष्ठ |
|---|---|---|---|
| ५८ | घरभिंती | आनंद यादव | २२१ |
| ५९ | घरभिंती | आनंद यादव | २४६ |
| ६० | घरभिंती | आनंद यादव | २५१ |
| ६१ | घरभिंती | आनंद यादव | २६२ |
| ६२ | घरभिंती | आनंद यादव | २९६ |
| ६३ | घरभिंती | आनंद यादव | ४२५ |
| ६४ | घरभिंती | आनंद यादव | ४३५ |
| ६५ | घरभिंती | आनंद यादव | ४३७ |
| ६६ | घरभिंती | आनंद यादव | ४७१ |
| ६७ | घरभिंती | आनंद यादव | ५१६ |
| ६८ | आनंदयादव : साहित्य आणि जीवन | डॉ. एस. एम. कानडजे | १०७-१०८ |
| ६९ | उपरा | लक्ष्मण माने | |
| ७० | उचल्या | लक्ष्मण गायकवाड | |
| ७१ | अक्कमाशी | शरणकुमार लिंबाळे | |
| ७२ | ताराळ-अंतराळ | शंकरराव खरात | |
| ७३ | आडवणीचे पक्षी | प्र. ई. सोनकांबळे | |
| ७४ | जिणं आमुचं | बेबी कांबळे | |
| ७५ | कोल्हाटपाच पोर | किशोर काळे | |
| ७६ | गबाळ | दादासाहेब मोरे | |
| ७७ | सारे प्रवासी घडीचे | जयवंत दळवी | |
| ७८ | मुक्काम पोस्ट देवाचे गोठणे | माधव कोंडविलकर | |